# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर। बीड। धाराशिव। नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक ३३७

। रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com



साईवेद प्रकाशन
विचारांचा प्रकाश, परिवर्तनाची दिशा

URGENTLY REQUIRED
RECEPTIONIST / TELECALLER - 01
Apply on mail:
saived.print@gmail.com
INTERVIEW DATE: 28 SEPTEMBER 2026
SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED
Office: Daily Rashtra Sahyadri Office,
Opposite Mac Care Hospital, Zopdi Canteen, Ahilyanagar.
Mo: 7588605255


## महत्वाचे...

### ऑस्करच्या रेसमध्ये भारताचा 'गोंधळ'!

**हनुमान अंश, धुरंधरला टाकले मागे**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : मराठी चित्रपट दिग्दर्शक संतोष दावखर यांचा मराठी थ्रिलर चित्रपट 'गोंधळ' हा ऑस्कर २०२७ साठी भारताचा अधिकृत चित्रपट ठरला आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने शुक्रवारी याची अधिकृत घोषणा केली. विशेष म्हणजे, बॉक्स ऑफिसवर गाजलेला हिंदी चित्रपट धुरंधर आणि यंदाचा चर्चेतील चित्रपट हनुमान अंश यांना मागे टाकत गोंधळची निवड झाली आहे. 'गोंधळ' हा ९९व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यात बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म या श्रेणीत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिग्दर्शक संतोष दावखर यांना २०२५ मध्ये झालेल्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये सिल्व्हर पीकॉक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. भारताच्या ऑस्कर एन्ट्रीसाठी यंदा एकूण ३३ चित्रपट स्पर्धेत होते. यामध्ये १४ हिंदी, प्रत्येकी चार मराठी, तेलुगू आणि गुजराती, तीन तमिळ, तर प्रत्येकी एक मल्याळम आणि नागामीज भाषेतील चित्रपटाचा समावेश होता. याशिवाय एका मूक चित्रपटाचाही स्पर्धेत समावेश होता. या चित्रपटांमधून अंतिम निवड करण्याची जबाबदारी परीक्षक मंडळावर होती. या ज्युरीमध्ये पी. शेषाद्री, विजय पाटकर, हुतू कनोडिया, शांती कुमार, संदीप पराशर, संजय पाटील, साबू जोसेफ, अनिल थॉमस, विवेक वासवानी, बिजोन दासगुप्ता, हसन, वासन आणि तनिष्ठा चॅटर्जी यांचा समावेश होता.

### सोन्याच्या दरात पुन्हा तेजी

**दोन दिवसांत ३० हजारांची वाढ**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून चढ-उतार सुरू असलेल्या सोन्याच्या दराने पुन्हा तेजी पकडली आहे. १९ सप्टेंबर रोजी देशांतर्गत बाजारात २४ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १५ हजार ५८४ रुपये प्रतिग्रॅमवर पोहोचला. गेल्या दोन सत्रांत १०० ग्रॅम सोन्याच्या दरात सुमारे ३० हजार रुपयांची वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा परिणाम सोन्याच्या दरावर होत आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घट, महागाईबाबत कमी झालेली चिंता आणि मध्यपूर्वेतील भू-राजकीय अनिश्चितता यामुळे सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहण्याचा कल वाढला आहे. शुक्रवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा दर एका आठवड्याच्या उच्चांकावर पोहोचला. दरम्यान, अमेरिकन डॉलरची मजबुती आणि अमेरिकेच्या व्याजदरविषयक निर्णयामुळे सोन्याच्या बाजारावर दबाव निर्माण होण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे आगामी काळात सोन्याच्या दरात चढ-उतार राहण्याची शक्यता बाजारातील विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. भारतात सणासुदीचा हंगाम सुरू होत असल्याने दागिन्यांची मागणीही दरावर परिणाम करू शकते.

# अमेरिकेचा भारताला १०० टक्के टॅरिफचा 'धक्का'!

## रशियन तेल खरेदीवरून ट्रम्प यांचा धक्कादायक निर्णय; भारतीय आयात-निर्यात आणि उद्योग क्षेत्रासमोर नवे आव्हान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वॉशिंग्टन/नवी दिल्ली** : रशियाकडून मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर आर्थिक दबाव वाढविण्याच्या दिशेने अमेरिकेने मोठे पाऊल टाकले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी "Lindsey O. Graham Sanctioning Russia and Iran Act of 2026' या कायद्यावर स्वाक्षरी केली असून, रशियन तेल अथवा वायूच्या मोठ्या खरेदीदार देशांच्या अमेरिकेतील वस्तूंवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त शुल्क लावण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना मिळाला आहे. भारत या प्रमुख खरेदीदार देशांमध्ये असल्याने भारतीय उद्योग, निर्यातदार आणि आयातदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, भारतावर सध्या १०० टक्के शुल्क लागू झालेले नाही; कायदा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना ते लागू करण्याचा अधिकार देतो.

अमेरिकन प्रतिनिधीगृहाने हे विधेयक २६२ विरुद्ध १५९ मतांनी, तर सिनेटने ऑगस्टमध्ये ८६ विरुद्ध ११ मतांनी मंजूर केले होते. १८ सप्टेंबर रोजी ट्रम्प यांनी त्याचे कायद्यात रूपांतर केले. भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीमध्ये रशियाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे अमेरिकेने भारतीय वस्तूंवर अतिरिक्त शुल्क लावल्यास अमेरिकेच्या बाजारपेठेवर अवलंबून असलेल्या भारतीय निर्यातदारांना थेट फटका बसू शकतो. वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्मिती, रसायने, ऑटोमोबाईल घटक, दागिने आणि विविध उत्पादन क्षेत्रांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यापारतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेच्या तुलनेत भारताच्या रशियाबरोबरच्या ऊर्जा व्यापाराचे प्रमाण मोठे असल्याने हा प्रश्न केवळ परराष्ट्र धोरणापुरता मर्यादित राहत नाही. कच्च्या तेलाच्या आयातीचा खर्च, रुपया-डॉलर विनिमय, उत्पादन खर्च आणि महागाई यांच्याशीही त्याचा संबंध जोडला जात आहे. भारताने मात्र आपल्या ऊर्जा सुरक्षेबाबत राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याची भूमिका घेतली आहे. रशियन तेलाच्या खरेदीवर परिणाम झाल्यास भारताला इतर पुरवठादारांकडून कच्चे तेल खरेदी करण्याचे प्रमाण वाढवावे लागू शकते. भारत आधीच इराक, सौदी अरेबिया, यूएई, कुवेत, नायजेरिया, ब्राझील आणि अमेरिकेकडून तेल आयात करतो. पुरवठ्याच्या स्रोतांमध्ये बदल झाल्यास कच्च्या तेलाच्या किमती, वाहतूक खर्च आणि रिफायनिंग अर्थकारणावर दबाव निर्माण होऊ शकतो.

दुसरीकडे, अमेरिकन बाजारपेठेत भारतीय उत्पादनांवर मोठे अतिरिक्त शुल्क लागू झाल्यास भारतीय निर्यातदारांच्या उत्पादनांची अमेरिकेतील किंमत वाढू शकते. परिणामी ऑर्डर, स्पर्धात्मकता आणि निर्यात उत्पन्नावर दबाव येण्याची शक्यता आहे. नव्या कायद्यात रशियाच्या ऊर्जा व संरक्षण क्षेत्रावर निर्बंधांसोबतच निर्बंध टाळून रशियन तेलाची वाहतूक करणाऱ्या जहाजांवरही कारवाईची तरतूद आहे. अशा जहाजांच्या जाळ्याला रशियाचा 'शॅडो फ्लीट' म्हटले जाते.

दरम्यान, या कायद्यानुसार राष्ट्राध्यक्षांना विशिष्ट परिस्थितीत शुल्क लागू करण्याबाबत अधिकार असून, काही परिस्थितीत सवलतीची तरतूदही आहे. त्यामुळे भारतावर १०० टक्के शुल्क कधी आणि प्रत्यक्षात लागू होईल का, याबाबतचे पुढील निर्णय महत्त्वाचे ठरणार आहेत. अमेरिकेचा निर्णय हा भारताच्या ऊर्जा सुरक्षा, आयात खर्च आणि अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीसाठी एकाच वेळी महत्त्वाचा ठरणार असल्याने केंद्र सरकार, उद्योगजगत आणि निर्यातदारांचे पुढील पाऊल आता निर्णायक ठरणार आहे.

## मातोश्रीच्या गेटवर हायव्होल्टेज ड्रामा!

### दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना ५०० कोटींची नोटीस




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरून शनिवारी मुंबईतील 'मातोश्री'बाहेर जोरदार राजकीय आणि कायदेशीर नाट्य पाहायला मिळाले. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन हे वकिलांच्या टीमसह मातोश्रीवर दाखल झाले. आदित्य ठाकरे यांच्या सोशल मीडिया पोस्टवर आक्षेप घेत त्यांना ५०० कोटी रुपयांची अब्रुनुकसानीची नोटीस देण्यात आली. नोटीसमध्ये माफी आणि नुकसानभरपाईची मागणी करण्यात आल्याचे वृत्त आहे. मातोश्रीवर पोहोचण्यापूर्वी सतीश सालियन यांनी आक्रमक भूमिका घेत, मला कोणीही कंट्रोल करू शकत नाही. फक्त देव मला कंट्रोल करू शकतो, असे स्पष्ट केले. पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी कायदेशीर लढाई पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. सालियन आणि त्यांच्या वकिलांचे पथक मातोश्रीवर पोहोचताच परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला. शिवसैनिक आणि सालियन यांच्या समर्थकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. मातोश्रीचे गेट बंद ठेवण्यात आले होते. दरम्यान, आदित्य ठाकरे यांच्या वतीने ॲडव्होकेट राहुल दिवटे आणि ॲडव्होकेट अनिल जाधव यांनी नोटीस स्वीकारली. नोटीस स्वीकारल्याची पावती सालियन यांच्या वकिलांना देण्यात आली. या घडामोडीमुळे दिशा सालियन मृत्यू प्रकरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले असून, पुढील कायदेशीर कारवाईकडे आता लक्ष लागले आहे. आदित्य ठाकरे यांनी यापूर्वी दिशा सालियन यांना आपण कधीही भेटलो किंवा ओळखत नव्हतो, असे सार्वजनिकरीत्या म्हटले आहे.

## विसापूर सब-स्टेशनवर कंत्राटी कामगाराचा मृत्यू

### महावितरणच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : विसापूर सब-स्टेशनलगत विजेचा तांत्रिक बिघाड दुरुस्त करताना कंत्राटी वीज कामगार खुशाल मानसिंग घाडगे यांचा विजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाला. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते ८.३०च्या सुमारास ही घटना घडली. या घटनेने महावितरणच्या सुरक्षा व्यवस्थेचे अक्षरशः वाभाडे काढले आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे संबंधित कामगाराने 'लाईन क्लिअरन्स' अर्थात परमिट घेतले होते, तर मग लाईनमध्ये वीजप्रवाह आला कसा? हा प्रश्न आता ग्रामस्थांकडून थेट महावितरणच्या कार्यपद्धतीवर उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शवविच्छेदन अहवाल आणि अधिकृत चौकशी अहवालातून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मात्र 'परमिट' असूनही कामगाराच्या जीवावर बेतलेली ही दुर्घटना महावितरणच्या सुरक्षा यंत्रणेतील त्रुटींचा गंभीर इशारा ठरली आहे.



**परमिटनंतरही वीजप्रवाह कसा?**

वीज दुरुस्तीच्या कामासाठी परमिट दिल्यानंतर संबंधित विद्युतवाहिनीचा वीजप्रवाह बंद करून कामगाराच्या सुरक्षिततेची खात्री करणे अपेक्षित असते. मात्र, परमिट असतानाही घाडगे यांना विजेचा धक्का बसला. त्यामुळे परमिट देण्यापूर्वी आणि त्यानंतर वीजपुरवठा बंद ठेवण्याची प्रक्रिया नेमकी पाळली होती का? सब-स्टेशनवरील ड्युटी कर्मचाऱ्यांकडून कोणती कार्यपद्धती अवलंबली गेली? याची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**कंत्राटदाराची सुरक्षा कुठे?**

घाडगे हे कंत्राटी पद्धतीने काम करत होते. उंचीवर वीजकाम करणाऱ्या कामगाराला आवश्यक हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, इन्सुलेटेड हातमोजे आणि अन्य सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आली होती का, हा दुसरा गंभीर प्रश्न आहे. सुरक्षा साधनांची उपलब्धता, त्यांचा प्रत्यक्ष वापर, कामगाराला देण्यात आलेले प्रशिक्षण आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

**'मानवी चूक' की गंभीर सुरक्षा त्रुटी?**

या दुर्घटनेमागे नेमकी चूक कुणाची, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. महावितरणची तांत्रिक कार्यपद्धती, परमिट प्रणाली आणि कंत्राटदाराची सुरक्षा व्यवस्था या तिन्ही बाबींची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वीज निरीक्षकांमार्फत या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोष निश्चित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

**घरचा कर्ता गेला; कुटुंब वाऱ्यावर**

खुशाल घाडगे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. कुटुंबातील कमावता आधारच गेल्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. त्यामुळे केवळ चौकशीचे आश्वासन न देता महावितरण आणि संबंधित ठेकेदाराने तातडीने आर्थिक मदतीचा प्रस्ताव मंजूर करावा, तसेच त्यांच्या पत्नीला रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**दहाव्या दिवसाची मुदत; अन्यथा आंदोलनाचा इशारा**

घाडगे यांच्या कुटुंबाला दहाव्या दिवसाच्या आत आर्थिक मदत आणि रोजगाराबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा या प्रकरणी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## मुख्य आरोपीच्या अटकेसाठी बेलवंडी बंद !

### एमआयडीसीतील माती-मुरूम उपसा व कथित हप्त्याच्या वादातून प्राणघातक हल्ला




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : लोणी व्यंकनाथ परिसरातील पार्वतवाडी-पिसोरे येथील प्रस्तावित एमआयडीसीच्या जागेतील माती-मुरूम उपसा व कथित हप्त्याच्या वादातून बेलवंडी येथील हिरवे कुटुंबातील तीन युवकांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ शनिवारी बेलवंडी गाव पूर्णपणे बंद ठेवण्यात आले. व्यापारी, नागरिक आणि विविध संघटनांनी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मुख्य आरोपीच्या अटकेची मागणी केली.

या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा आणि बेलवंडी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून, त्यामध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे. मात्र, हल्ल्याचा मुख्य आरोपी सुजीत इथापे अद्याप फरार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मुख्य (पान ४ वर)

## समुद्राचे पाणी तापणार, नद्या आटणार, जंगले पेटणार..!

### भयानक 'अल-नीनो'ची चाहूल; भारताच्या परिसंस्थांवर गंभीर परिणामांची शक्यता



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : २०२६-२७ मध्ये विकसित होत असलेल्या अत्यंत शक्तिशाली 'अल-नीनो'च्या पार्श्वभूमीवर भारतातील पर्यावरणीय परिसंस्थांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. देशातील १८८ पर्यावरण आणि हवामान संशोधकांनी या संभाव्य परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करून सरकार, संशोधन संस्था आणि निधी देणाऱ्या यंत्रणांनी तातडीने निरीक्षण व संशोधन वाढवावे, असे आवाहन केले आहे. 'अल-नीनो' ही प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान असामान्यरीत्या वाढण्याशी संबंधित हवामान घटना आहे. त्याचा जगभरातील पर्जन्यमान आणि तापमानाच्या स्थितीवर परिणाम होऊ शकतो.

भारतात अल-नीनोचा संबंध अनेकदा कमकुवत किंवा अनियमित मान्सून आणि उष्ण हवामानाशी जोडला जातो; मात्र प्रत्येक अल-नीनोचा परिणाम एकसारखा होत नाही. १६ सप्टेंबर २०२६ रोजी 'इंडिया इकॉलॉजी कलेक्टिव्ह'च्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या आवाहनात समुद्री, गोड्या पाण्याच्या आणि जमिनीवरील परिसंस्थांचे सातत्याने निरीक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तापमान वाढ आणि पाण्याची कमतरता वाढल्यास जंगलांमध्ये वणव्यांचा धोका वाढू शकतो. त्याचा वनस्पती, पक्षी आणि वन्यजीवांच्या अधिवासावर परिणाम होण्याची शक्यता आहे. वनस्पतींच्या फुलोऱ्यात किंवा फळधारणेत बदल तसेच प्राण्यांच्या वर्तनात बदल होऊ शकतात.

समुद्राच्या तापमानात वाढ झाल्यास 'मरीन हीटवेव्ह' निर्माण होऊन प्रवाळभित्तींवर परिणाम होऊ शकतो. समुद्री तापमानातील बदलामुळे माशांचे अधिवास आणि अन्नसाखळी प्रभावित होण्याची शक्यता असल्याने किनारपट्टीवरील मच्छीमार समुदायांवरही त्याचे आर्थिक परिणाम होऊ शकतात. शहरी भागात वाढत्या तापमानासोबत 'अर्बन हीट आयलंड'चा प्रभाव अधिक जाणवू शकतो.

दुसरीकडे कमी पाऊस आणि वाढते तापमान यामुळे शेती, पशुपालन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर (पान ४ वर)

**'अल-नीनो'बाबत वैज्ञानिकांचा इशारा**

२०२६-२७ मध्ये अत्यंत शक्तिशाली अल-नीनो विकसित होण्याची शक्यता.

१८८ पर्यावरणशास्त्रज्ञांनी संयुक्तपणे तातडीच्या निरीक्षणाचे आवाहन केले.

जंगलांमध्ये वणव्यांचा धोका वाढण्याची शक्यता.

समुद्री उष्णतेमुळे प्रवाळभित्तींवर परिणाम होऊ शकतो.

शेती, पशुपालन आणि मत्स्यव्यवसायावर पाणी व तापमान बदलांचा परिणाम होऊ शकतो.

मात्र अल-नीनोमुळे भारतात निश्चितच दुष्काळ पडेल, असा निष्कर्ष काढता येत नाही; परिणाम प्रदेश, हंगाम आणि इतर हवामान घटकांनुसार बदलू शकतात.

त्यामुळे पूर्वतयारी, सातत्यपूर्ण निरीक्षण आणि वैज्ञानिक नोंदणीवर भर देण्याचे आवाहन.

## श्रीरामपूरच्या बाजारात मोबाईल चोरांचा धुडगूस

### पत्रकार, प्राचार्य, व्यापाऱ्यांसह नऊ जणांचे मोबाईल लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील आठवडे बाजारात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी तब्बल नऊ मोबाईल लंपास केले. मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार मनोज आगे, शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांच्यासह नऊ जणांचे मोबाईल शुक्रवारी (दि. १८) सायंकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास श्रीरामपूर आठवडे बाजारातून चोरीस गेले. पोलिसांकडे दाखल फिर्यादीनुसार चोरी गेलेल्या नऊ मोबाईलची किंमत सुमारे १ लाख ३० हजार ५०० रुपये आहे. पत्रकार मनोज शंकरराव आगे (वय ५९) यांनी याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. आठवडे बाजारातील गर्दीत खरेदी करत असताना चोरट्यांनी आगे यांच्या (पान ४ वर)

> श्रीरामपूर आठवडे बाजारातून माझा मोबाईल चोरी जाण्याची ही दुसरी घटना आहे. एका घटनेत रिपब्लिकन पक्षाचे नेते सुभाष त्रिभुवन यांनी थेट चोराचा फोटो पोलिसांना दिला. गेल्यावेळी मी देखील पोलिसांना चोरीचे सीसीटीव्ही फुटेज दिले होते. मात्र पोलिसांनी तपासाकडे दुर्लक्ष केले. पहिला मोबाईल चोरीला गेलेला असताना आता पुन्हा दुसरा मोबाईल देखील चोरीला गेला. दर आठवड्याला किमान दहा-पंधरा मोबाईल बाजारातून चोरी जातात. पोलीस मात्र त्याकडे दुर्लक्ष करतात. पुरावे देऊनही तपास होत नसल्याने चोरांची हिंमत वाढते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यायला हवी.
>
> **- मनोज आगे**

## उपचारासाठी घाटीत गेलेल्या तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**छत्रपती संभाजीनगर** : घाटी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या २० वर्षीय तरुणीला रस्ता दाखविण्याच्या बहाण्याने निर्जन ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तरुणीने प्रसंगावधान राखत आरोपीच्या हाताचा चावा घेत जोरदार प्रतिकार केल्याने त्याचा प्रयत्न फसला. या प्रकरणी बेगमपुरा पोलिसांनी दोन संशयितांना अवघ्या २४ तासांत अटक केली. रोहन जगदिश रिडलॉन (२४, रा. मुंबई) आणि विशाल प्रकाश चावरिया (रा. घाटी क्वार्टर्स, छत्रपती संभाजीनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैजापूरची मूळ रहिवासी असलेली तरुणी १९ सप्टेंबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास डोळ्याच्या उपचारासाठी घाटी रुग्णालयात आली होती. डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला पुढील तपासणीसाठी वॉर्ड क्रमांक ११ मध्ये जाण्यास सांगितले. वॉर्डकडे जात असताना विशाल व रोहन यांनी रस्ता दाखविण्याच्या बहाण्याने तिला एसएसबी इमारतीजवळ नेले. तेथे मारहाण व धमकी देऊन तिला दुचाकीवर बसवून एका पडक्या इमारतीच्या गच्चीवर नेण्यात आले. विशाल खाली थांबला, तर रोहनने तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरुणीने आरडाओरड करत त्याच्या हाताचा चावा घेतला आणि तेथून पळ काढला. त्यानंतर तिने बेगमपुरा पोलिसांत तक्रार दिली.

## ऑटोमॅटिक कारचा ताबा सुटला अन् थेट दुकानात घुसली!



छायाचित्र : दत्तात्रय मेटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : ऑटोमॅटिक कार चालविताना चालकाचा ताबा सुटल्याने कारने दोघांना उडवत थेट दुकानाच्या पायरीवर चढून शटरला धडक दिली. श्रीरामपूर शहरातील महात्मा गांधी चौकात घडलेल्या या थरारक घटनेने काही क्षणांसाठी परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. स्थानिकांच्या माहितीनुसार, राजेंद्र गवारे हे कार चालवत होते. त्यांनी ही कार अवघ्या एक दिवसापूर्वी खरेदी केली होती. ऑटोमॅटिक कार चालविण्याचा पुरेसा अनुभव नसल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती आहे. धडकेत दुकानाचे शटर, दुकानासमोरील काही साहित्य आणि कारचे नुकसान झाले.

## मोबाईलच्या पडद्याआड हरवणारे वाचनविश्व!

स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि रील्सच्या वाढत्या वापरामुळे माणसाच्या हातातील पुस्तक हळूहळू दूर जात असल्याची चिंता जगभर व्यक्त होत आहे. माहिती, मनोरंजन आणि संवादाची साधने म्हणून मोबाईलचे महत्त्व नाकारता येणार नाही; मात्र त्याचा अतिवापर ही आजच्या समाजासमोरील गंभीर समस्या बनत आहे. विशेषतः लहान मुले आणि तरुणांचा मोठा वेळ सतत स्क्रीनकडे पाहण्यात जात असल्याने एकाग्रता, चिंतन, सखोल वाचन आणि प्रत्यक्ष संवाद यांसारख्या सवयींवर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर सिंगापूर सरकारने वाचनाची सवय वाढविण्यासाठी सुरू केलेले अभियान चर्चेचा विषय ठरले आहे.

सिंगापूरमध्ये नागरिकांनी दररोज किमान काही वेळ वाचनासाठी द्यावा, वाचनाची नोंद डिजिटल पद्धतीने करावी आणि त्यातून गुण मिळवावेत, अशा स्वरूपाचा उपक्रम राबविला जात असल्याची माहिती समोर आली आहे. वाचनासारख्या साध्या आणि व्यक्तिगत सवयीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्याची ही कल्पना महत्त्वाची आहे. कारण वाचन हे केवळ विरंगुळ्याची बाब नसून व्यक्तीच्या बौद्धिक आणि सामाजिक विकासाशी जोडलेली प्रक्रिया आहे.जगातील अनेक देशांनी विविध पद्धतींनी वाचनसंस्कृती वाढविण्याचे प्रयत्न केले आहेत. काही ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालयांचा विस्तार, पुस्तक वाचनासाठी विशेष मोहिमा, शाळांमध्ये स्वतंत्र वाचनाचा वेळ, पुस्तक महोत्सव, लेखक-वाचक संवाद आणि डिजिटल वाचन सुविधा अशा माध्यमांतून वाचनाला प्रोत्साहन देण्यात आले. या सर्व प्रयोगांमागील समान उद्देश एकच-नागरिकांच्या हातात पुन्हा पुस्तक पोहोचवणे आणि माहितीचा सखोल अभ्यास करण्याची सवय निर्माण करणे. आज आपल्या हातात पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक माहिती उपलब्ध आहे. पण माहितीची उपलब्धता आणि ज्ञानाची निर्मिती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सोशल मीडियावर एखादी पोस्ट काही सेकंदांत वाचली जाते; रील काही सेकंदांत संपते; एका क्लिकवर शेकडो संदेश समोर येतात. मात्र पुस्तक, वर्तमानपत्र किंवा दर्जेदार साहित्य वाचताना विचार करावा लागतो, संदर्भ समजून घ्यावा लागतो, प्रश्न निर्माण होतात आणि त्या प्रश्नांवर स्वतःचे मत तयार करावे लागते. म्हणूनच वाचन माणसाला केवळ माहिती देत नाही, तर विचार करण्याची क्षमता विकसित करते.




मोबाईलच्या अतिवापराचा सर्वांत मोठा धोका म्हणजे सतत बदलणाऱ्या, झटपट मिळणाऱ्या मनोरंजनाची सवय. काही सेकंदांत नवे दृश्य, नवी बातमी, नवा व्हिडिओ मिळण्याची सवय लागल्यावर दीर्घ मजकूर वाचणे कंटाळवाणे वाटू शकते. पुस्तक वाचण्यासाठी लागणारी शांतता आणि एकाग्रता कमी होऊ शकते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, भाषिक क्षमतेवर आणि सखोल आकलनावरही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोबाईलविरोधात भूमिका घेण्यापेक्षा मोबाईलचा विवेकी वापर आणि वाचनासाठी निश्चित वेळ निर्माण करणे अधिक गरजेचे आहे.या संदर्भात भारतासाठी सिंगापूरचा प्रयोग प्रेरणादायी आहे. विशेषतः महाराष्ट्राने सिंगापूरसारख्या प्रयोगांकडे केवळ कौतुकाने पाहून थांबता कामा नये. आपली स्वतःची समृद्ध वाचनपरंपरा आहे. संत साहित्यापासून आधुनिक मराठी साहित्यापर्यंत महाराष्ट्राने समाजमन घडविणारे असंख्य लेखक, कवी, विचारवंत आणि पत्रकार दिले आहेत. वर्तमानपत्रांनीही महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जडणघडणीत मोठी भूमिका बजावली आहे. त्यामुळे वाचनसंस्कृती पुस्तकांसोबत वर्तमानपत्र आणि मराठी साहित्याला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

सरकारने शाळा-महाविद्यालयांमध्ये 'दररोज काही वेळ वाचन' हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा विचार करावा. प्रत्येक शाळेत समृद्ध ग्रंथालय, स्थानिक लेखकांची पुस्तके, बालसाहित्य आणि वर्तमानपत्रे उपलब्ध करून द्यावीत. गावागावांत सार्वजनिक वाचनालयांना सक्षम करणे, फिरती ग्रंथालये सुरू करणे, वाचनालयांना डिजिटल साधने उपलब्ध करून देणे आणि पुस्तक खरेदीसाठी स्वतंत्र निधी देणे यांसारख्या उपाययोजना करता येऊ शकतात. त्याचबरोबर वर्तमानपत्रांकडे केवळ बातम्यांचे माध्यम म्हणून न पाहता वाचनसंस्कृतीचा महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना नियमित वर्तमानपत्र वाचनाची सवय लागावी यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'वर्तमानपत्र वाचन तास', बातमीवाचन, संपादकीय चर्चा, लेखन स्पर्धा आणि स्थानिक प्रश्नांवरील चर्चासत्रे आयोजित करता येतील. यातून विद्यार्थ्यांना केवळ भाषा शिकता येणार नाही, तर समाज, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि देश-दुनियेतील घडामोडी समजून घेण्याची संधी मिळेल. साहित्यिक कार्यक्रमांनाही नव्या पिढीशी जोडण्याची वेळ आली आहे. लेखक-वाचक संवाद, काव्यवाचन, पुस्तक चर्चा, साहित्य संमेलने, कथाकथन, युवा साहित्य महोत्सव आणि गावपातळीवरील वाचन चळवळी यांना शासनाने प्रोत्साहन द्यावे. मोबाईलवर रमलेल्या तरुणांना दोष देण्याऐवजी त्याच डिजिटल माध्यमाचा उपयोग पुस्तक, लेखक आणि साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी केला पाहिजे.

शेवटी प्रश्न मोबाईलचा नाही, तर मोबाईल आपल्या जीवनावर किती नियंत्रण ठेवतो याचा आहे. तंत्रज्ञानापासून दूर जाणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. पण तंत्रज्ञानाचा वापर करताना पुस्तकासाठी, वर्तमानपत्रासाठी आणि विचारासाठी वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे. सिंगापूरचा प्रयोग आपल्याला हाच धडा देतो की, वाचनाची सवय आपोआप टिकत नाही; ती जपावी लागते, वाढवावी लागते आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावी लागते. आज वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे म्हणजे उद्याचा विचारशील, आकलनशील आणि जबाबदार नागरिक घडवणे होय. अधिक जाणकार, चिकित्सक, संवेदनशील आणि विचारशील समाज घडविण्यात त्याचा हातभार लागेल. मोबाईल हातात असला तरी पुस्तक मनात असावे, वर्तमानपत्रातून समाज समजावा आणि साहित्यामधून माणूसपण समृद्ध व्हावे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

## शिर्डी पोलिसांची दमदार कामगिरी, अट्टल दुचाकी चोरट्याकडून ११ मोटारसायकली जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी :** परिसरातील वाढत्या मोटारसायकल चोऱ्यांमुळे नागरिक त्रस्त असताना, शिर्डी पोलिसांनी अत्यंत सतर्कता आणि वेगाने तपास करत एका अट्टल दुचाकी चोराला जेरबंद करण्यात मोठे यश मिळवले आहे. विशाल रतन चव्हाण (वय २४, मूळ रा. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, सध्या रा. कालिकानगर, शिर्डी) असे या अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे.

शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी संशयित विशाल चव्हाण याला ताब्यात घेतले. सुरुवातीला संशयावरून चौकशी केल्यानंतर त्याने अत्यंत चलाखीने केलेल्या मोटारसायकल चोऱ्यांचा पोलखोल केली. त्याने केवळ शिर्डीतच नव्हे, तर पैठण, बिडकीन, चाळीसगाव, नगरदेवळा आणि सोयगाव यांसारख्या विविध दूरवरच्या परिसरांमध्येही आपल्या चोऱ्यांचे जाळे पसरवून तिथे या गाड्या लपवून ठेवल्याची माहिती दिली. आरोपीच्या या कबुलीनंतर शिर्डी पोलिसांनी विविध ठिकाणी छापेमारी करून तब्बल ११ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

तपासामध्ये या चोराचे कनेक्शन शिर्डीपासून थेट चाळीसगाव आणि नेवासापर्यंत पसरल्याचे निष्पन्न झाले आहे. आतापर्यंतच्या तपासात या ११ पैकी किमान ६ वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल झाली आहे. यामध्ये शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल दोन, तर श्रीरामपूर शहर, चाळीसगाव शहर, चाळीसगाव ग्रामीण आणि नेवासा पोलीस ठाण्यांमध्ये दाखल प्रत्येकी एका अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये चार हॉंडा शाईन, दोन हिरो स्प्लेंडर प्लस, एक टीव्हीएस स्टार सिटी प्लस आणि तीन बजाज पल्सर मोटारसायकलींचा समावेश असून, यातील दोन गाड्या तर विनानंबर प्लेटच्या आढळून आल्या आहेत. आरोपीच्या या कसून चौकशीमुळे आगामी काळात आणखी काही जुने गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

ही संपूर्ण धडक कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डी पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. यामध्ये पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पेशकुमार चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सागर काळे, प्रदीप बोराडे, महादेव गुट्टे तसेच पोलीस अंमलदार आणि होमगार्ड यांच्या पथकाने मोलाची कामगिरी बजावली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल संतोष लांडे आणि पोलीस अंमलदार राघव कोतकर यांच्यामार्फत केला जात आहे.

## विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी साकारली गणेश सजावट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील श्री चैतन्य स्टार किड्स विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत पर्यावरणपूरक व सृजनशील पद्धतीने गणेश सजावट करण्यात आली. सजावटीसाठी बाजारातील तयार वस्तूंचा वापर न करता विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली गणेशचित्रे, हस्तकला व विविध कलाकृतींचा उपयोग करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने गणेशाच्या सुंदर प्रतिमा, आकर्षक हस्तकला तसेच सजावटीच्या वस्तू तयार केल्या. या उपक्रमातून कला, कल्पनाशक्ती, स्वनिर्मिती आणि पर्यावरणपूरक सजावटीचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मक कौशल्याला चालना मिळण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास, सहकार्याची भावना आणि स्वतःच्या हातांनी सुंदर निर्मिती करण्याची प्रेरणा निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विद्यालयातील गणेश सजावट आकर्षक व अर्थपूर्ण ठरली. या उपक्रमाचे पालक व शिक्षकांनी कौतुक केले.



## डॉ. चौधरी हॉस्पिटलमध्ये गणरायाचे भक्तीभावाने स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** विघ्नहर्ता श्री गणरायाच्या आगमनाने सर्वत्र भक्तीमय वातावरण असताना शिर्डी-राहाता रोडवरील नगर-मनमाड महामार्गावरील दंडवते कॉम्प्लेक्स येथील 'डॉ. चौधरी मेंदू व मणके विकार हॉस्पिटल' मध्येही बाप्पाचे मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने स्वागत करण्यात आले. यावेळी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा प्रसिद्ध मेंदू व मणके विकार तज्ज्ञ डॉ. मुकुंद अर्जुन चौधरी यांच्या हस्ते गणरायाची विधिवत प्राणप्रतिष्ठा व पूजन करण्यात आले. हॉस्पिटलमधील डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, कर्मचारी व रुग्णांच्या नातेवाईकांनी या पूजन सोहळ्यात मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. गणेशोत्सवानिमित्त हॉस्पिटल परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. ''रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा'' मानून काम करणाऱ्या या हॉस्पिटलमध्ये बाप्पाच्या आगमनामुळे एक वेगळाच उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, सर्व रुग्णांना लवकर आराम मिळावा यासाठी यावेळी गणरायाकडे प्रार्थना करण्यात आली.

## शनिशिंगणापूर मंदिराकडे जाणारा रस्ता खड्ड्यात ; भाविक, प्रवाशांची गैरसोय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील प्रसिद्ध शनिशिंगणापूर येथे शनी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या प्रवाशांना सध्या खड्डेमय रस्त्याचा सामना करावा लागत आहे. शनी मंदिरापासून शनेश्वर रुग्णालयापर्यंतच्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. या मार्गावरून भाविकांची तसेच स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र, रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. खड्डे चुकविताना वाहनांचा अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे. शनिशिंगणापूर हे राज्यासह देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, दररोज मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. अशा महत्त्वाच्या धार्मिक स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याची ही अवस्था असल्याने भाविकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्यास त्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका आणखी वाढतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने या रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवावेत तसेच रस्त्याची आवश्यक ती दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थ, वाहनचालक, प्रवासी आणि भाविक भक्तांकडून होत आहे.

> शनिशिंगणापूरच्या महत्त्वाच्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करा!
> भाविक, ग्रामस्थ व प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन संबंधित विभागाने त्वरित रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवावेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.
> **बाळासाहेब जनार्दन सोनवणे**
> **माजी पंचायत समिती सदस्य**

## अनाधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांवर आता फौजदारी कारवाई : मुख्याधिकारी विद्या पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** राहुरी शहर हद्दीत अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांवर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल करून कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन कायद्यानुसार कोणतीही पूर्वपरवानगी न घेता वृक्षतोड करणे हा कायदेशीर गुन्हा असून, नागरिकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असा कडक इशारा राहुरी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी तथा वृक्ष प्राधिकरण समितीच्या अध्यक्षा विद्या पाटील यांनी दिला आहे. शहरात सुरू असलेली नवीन बांधकामे, रस्ता रुंदीकरण अथवा वैयक्तिक कारणांसाठी नियमांचे उल्लंघन करून लहान-मोठी झाडे विनापरवाना तोडली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती देताना मुख्याधिकारी पाटील यांनी स्पष्ट केले की, 'महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५' व सुधारित 'अधिनियम २०२१' नुसार कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक किंवा स्वतःच्या मालकीच्या खाजगी जागेतील झाड सक्षम प्राधिकरणाच्या लेखी परवानगीशिवाय तोडण्याचा अथवा छाटण्याचा अधिकार नाही. झाड सुकलेले, पडण्याच्या स्थितीत अथवा धोकादायक असले, तरीही स्थानिक वृक्ष प्राधिकरण समितीची रीतसर पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. विनापरवाना वृक्षतोड केल्यास अथवा वृक्षांचे नुकसान केल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर मोठा दंड आणि थेट फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. शहरात कुठेही बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास जागरूक नागरिकांनी नगरपालिकेकडे लेखी तक्रार करावी, तसेच शहर हरित व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी केले आहे.

> **अर्जासोबत ही कागदपत्रे आवश्यक**
> वृक्षतोड किंवा फांद्या छाटणीच्या परवानगीसाठी अर्जदाराचे आधार कार्ड, ७/१२ उतारा अथवा मालमत्ता कर पावती, झाडाचे स्पष्ट जिओ-टॅग छायाचित्र आणि नवीन बांधकामाच्या ठिकाणी वृक्षतोड करायची असल्यास मंजूर बांधकाम परवानगी आदेशाची प्रत जोडणे आवश्यक आहे.
> **विद्या पाटील**
> **मुख्याधिकारी, राहुरी नगरपरिषद**

## नृत्य स्पर्धेतून शाळेला मदतीचा हात : जगदंब मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील सांगवी येथील जगदंब मित्र मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून शाळेला भरघोस मदत करण्यात आली. मंडळाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, आत्मविश्वास वाढावा तसेच सांस्कृतिक क्षेत्रात त्यांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने नृत्य स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध नृत्यप्रकार सादर केले. या उपक्रमासाठी जगदंब मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कर्डिले, जयेश कर्डिले, प्रणव कर्डिले व महेश होले यांचे विशेष सहकार्य लाभले. शाळेच्या गरजा लक्षात घेऊन मंडळाने मदतीचा हात पुढे केल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी प्रोत्साहन मिळणार आहे. शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका मनीषा चाबुकस्वार यांनी विद्यार्थ्यांना नृत्याचे मार्गदर्शन करून सराव करून घेतला. मुख्याध्यापक सूर्यभान पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले. तसेच शाळेच्या विकासासाठी मदत केल्याबद्दल जगदंब मित्र मंडळाचे आभार मानले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



## आ. सुरेश धस यांनी घेतले भगवान दत्तात्रयाचे दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** आष्टी मतदारसंघाचे अभ्यासू नेतृत्व आमदार सुरेश धस यांनी नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पीठ येथे भेट देऊन भगवान श्री दत्तात्रयांचे भावपूर्ण दर्शन घेतले.

प्रवरा नदीच्या पवित्र किनाऱ्यावर वसलेल्या या अत्यंत सुंदर, सुसज्ज आणि मनाला शांतता देणाऱ्या प्रांगणात त्यांनी श्रीसमर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन चरणी माथा टेकवला. याप्रसंगी त्यांनी श्री गुरुदेव दत्त पीठाचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.



दर्शनानंतर बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की ''प्रवरा माईच्या कुशीत वसलेला हा देवगड परिसर अत्यंत प्रसन्न आणि ऊर्जादायी आहे. भगवान दत्तात्रेय, सद्गुरू किसनगिरी महाराज आणि प. पू. भास्करगिरीजी महाराजांच्या दर्शनाने अंतर्मन प्रसन्न होऊन एक वेगळाच उत्साह आणि समाधान मिळते.''

या प्रसंगी भारतीय जनता पार्टी ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुधाकरराव आव्हाड,नगरचे माजी उपसभापती रविंद्र भापकर,अमोल शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## प्रणल अरगडेची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड

### जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिंगणापूर :** अहिल्यानगर अर्बन अँड रूरल कराटे-डो असोसिएशनतर्फे अहिल्यानगर येथील आनंद शाळेत आयोजित जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत सौंदाळा येथील कु. प्रणल शरद अरगडे हिने १४ वर्षांखालील वयोगटात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या दैदिप्यमान यशामुळे तिची मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धे दरम्यान प्रणलने आपल्या अचूक डावपेचांनी, आत्मविश्वासपूर्ण खेळाने आणि उल्लेखनीय कौशल्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या यशामुळे सौंदाळा गावाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली असून, गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. प्रणल ही महावितरण कंपनी, अहिल्यानगर येथे प्रशासकीय सेवेत कार्यरत शरद अरगडे यांची कन्या आहे. तिला कराटे प्रशिक्षक प्रशांत पालवे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रणलच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि क्रीडाप्रेमींकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक केले जात आहे.

## प्रा.संतोष सोनवणे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित .

### लोककला कलावंत साहित्यिक परिषदेचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ .

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा:** नेवासा तालुक्यातील भेंडा येथील जिजामाता उच्च माध्यमिक विभागातील मराठी विषयाचे प्रा संतोष सोनवणे यांना त्यांच्या शैक्षणिक योगदान तसेच सामाजिक,पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले लोककला कलावंत साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य व लक्ष्मी माता मंदिर ट्रस्ट वडाळा महादेव आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा व काव्य संमेलनाचे आयोजन दि १३ रविवार रोजी लोकमान्य टिळक वाचनालय श्रीरामपूर येथे आयोजन करण्यात आले होते . प्रसंगी उदघाटक प्रा.डी.के मांडलिक होते तर अध्यक्षस्थानी डॉ बाबुराव उपाध्ये होते. प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक राष्ट्र सहयाद्रीचे संपादक करण नवले, मोहीनाराज होन, सायमन भारस्कर ,विजय शेलार, भाऊसाहेब भोंडगे, गीतकार बाबासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक दिलीप मांडलिक, पोलीस उपनिरीक्षक अशोक आढागळे, पत्रकार प्रकाश कुलथे, डॉ. संजय दुशिंग, दिनकर गर्जे आदी उपस्थित होते. विविध क्षेत्रातील कामगिरी करणाऱ्या कर्तृत्व संपन्न व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले 'चमकणारे दिवे 'या गोरक्षनाथ पवार लिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले .प्रसंगी अनेक साहित्यिकांना काव्यसंमेलनात उस्फूर्त सहभाग नोंदविला .

## कोपरगाव तालुका जिनिंग प्रेसिंग सोसायटीची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** शेतकऱ्यांच्या हितासाठी माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी अनेक सहकारी संस्था स्थापण केल्या आणि त्या संस्था जीवापाड जपल्या त्यापैकीच कोपरगाव तालुका सहकारी जिनिंग प्रेसिंग सोसायटी हि एक संस्था आहे. काळानुरूप आलेल्या सर्व प्रकारच्या संकटावर मात करून संस्थेने कोरुगेटेड बॉक्स तयार करण्याचा पर्यायी व्यवसाय सुरु केला आणि त्यात यश मिळवून हा व्यवसाय चांगल्या प्रकारे सुरु आहे .अहवाल सालात संचालक मंडळाने अतिशय चांगले काम करून नफा देखील चांगला मिळविला असून ऑडिट वर्ग 'अ' मिळाला ही समाधानाची बाब आहे असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव तालुका सहकारी जिनिंग प्रेसिंग सोसायटीच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासद आणि संचालक मंडळाशी संवाद साधतांना केले.



कोपरगाव तालुका सहकारी कापूस जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटीची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या सभागृहात संस्थेचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी उपस्थित सभासदांना आ.आशुतोष काळे यांनी मार्गदर्शन करून संवाद साधला. संस्थेचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार यांनी प्रास्ताविक केले. अहवाल वाचन संस्थेचे जनरल मॅनेजर सुरेश काशीद यांनी केले.श्रद्धांजली ठराव वाचन संचालक महेश लोंढे यांनी केले. सभासदांच्या वतीने विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यात आले.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे मा.व्हा.चेअरमन पद्माकांत कुदळे, विद्यमान संचालक दिलीपराव बोरनारे,सुधाकर रोहोम, शंकरराव चव्हाण, विष्णू शिंदे, माजी संचालक राजेंद्र गिरमे, शिवाजीराव ठाकरे तसेच संस्थेचे व्हा.चेअरमन संजय संवत्सरकर, संचालक नानासाहेब निकम, शंकरराव गुरसळ, सुभाष सोनवणे, सचिन आव्हाड, गणेश गायकवाड,महेश लोंढे, नानासाहेब चौधरी, संदीप शिंदे, पाराजी गवळी, सौ. विमलबाई गवारे, सौ. कांताबाई दहे, शिवाजीराव शेळके, संतोष वर्पे आदी मान्यवरांसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन गुलाब शेख यांनी केले तर व्हा.चेअरमन संजय संवत्सरकर यांनी आभार मानले.

फोटो ओळ-कोपरगाव तालुका सहकारी कापूस जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटीच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करतांना आ.आशुतोष काळे,चेअरमन गोरक्षनाथ जामदार, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ व मान्यवर.

## विजेच्या खेळखंडोब्याविरोधात मंगळवारी जनआक्रोश मोर्चा

### हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज मिळण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना हक्काचे पाणी आणि पूर्ण दाबाने सुरळीत वीज मिळावी, या मागणीसाठी मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत हा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात यांनी दिली. वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी मेळाव्यात त्या बोलत होत्या. यशोधन कार्यालयाच्या प्रांगणातून प्रांताधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात येणार आहे. डॉ. थोरात म्हणाल्या, संगमनेर तालुका मोठ्या कष्टातून विकसित झाला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी भंडारदरा धरणातून तालुक्याला हक्काचे ३० टक्के पाणी मिळवून दिले. दुष्काळी भागासाठी निळवंडे धरण व दोन्ही कालवे पूर्ण करण्यात आले. मात्र कालव्यांमधून पाणी उपलब्ध झाल्यानंतर वीजपुरवठ्यात वारंवार व्यत्यय येत असल्याने पाणी पुढे नेण्यात अडथळे निर्माण होत आहेत. तालुक्यात रात्री सहा ते नऊ या वेळेत भारनियमन सुरू असून, याबाबत वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित कार्यवाही झालेली नाही. शेतकऱ्यांना अकरा तास पूर्ण दाबाने वीज आणि तालुक्याच्या हक्काचे पाणी मिळावे, ही मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. मोर्चात आमदार सत्यजित तांबे यांच्यासह सर्वपक्षीय नेते, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला व शेतकरी सहभागी होणार आहेत. तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विविध राजकीय पक्ष, सामाजिक व विद्यार्थी संघटना तसेच तालुका कृती समितीने केले आहे.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## डॉ. विजय पाटील यांची विखे पाटील मेडिकल कॉलेजच्या प्राचार्यपदी नियुक्ती



**झरेकाठी** : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे डॉ. विजय बाळकृष्ण पाटील यांची प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. विजय पाटील हे प्रवरा परिसराशी जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील ड. बाळकृष्ण पाटील यांचे चिरंजीव आहेत. डॉ. विजय पाटील यांनी यापूर्वी धुळे येथील मेडिकल कॉलेजमध्ये डीन म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. तसेच साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटलमध्येही त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात सेवा बजावली आहे. वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवेतील त्यांच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आता फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजच्या प्राचार्यपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, विश्वस्त सुवर्णाताई विखे पाटील, धनश्री ताई विखे पाटील, आणि विश्वस्त ध्रुव विखे पाटील, डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. किरण आहेर यांनी शुभेच्छा दिल्या.

## रोप स्किपिंग स्पर्धेने द्रोणा अकॅडमीच्या क्रीडा क्षेत्रात भर : जयराज दंडवते



**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा अकॅडमी तर्फे शिर्डी साई पालखी निवारा या ठिकाणी सीबीएसई नॅशनल लेवल रोप स्किपिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धे साठी विविध शाळेमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत. आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. रोप स्किपिंग स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून लाभलेले सुभाष नायर सीबीएसई रोप स्किपिंग,हरपाल सिंग टेक्निकल हेड रोप स्किपिंग सी. बी. एस. ई. डॉ. शिखा गुप्ता व्हाईस फेडरेशन रोप स्केटिंग सी. बी. एस. ई. हे उपस्थित होते. भारत देशातील विविध राज्यातून स्पर्धक या ठिकाणी उपस्थित होते. रोप स्किपिंग या स्पर्धेमध्ये वेग, चपळता, समन्वय, एक्राग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा सुंदर मिलाप पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या रोप स्किपिंग सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## साईनाथनगर येथील लताबाई ससे यांचे मरणोत्तर नेत्रदान व देहदान



**नेवासा** : तालुक्यातील साईनाथनगर येथील लताबाई गिनंदेव ससे (वय ६० वर्षे), यांचे गुरुवार दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार आणि जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी, नाणीजधाम यांच्या प्रेरणेने त्यांचे मरणोत्तर नेत्रदान व देहदान करण्यात आले. त्यांचे नेत्र एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय (नेत्रपेढी) येथे दान करण्यात आले तर त्यांचा देह डॉ.बाळासाहेब विखे पाटील मेडिकल कॉलेज, लोणी, ता. राहता येथे वैद्यकीय शिक्षणासाठी दान करण्यात आला आहे. त्यांच्या या त्यागमय आणि आदर्शवत निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. 'मरावे परी कीर्तिरूपी उरावे' या उक्तीचा प्रत्यय त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. या प्रसंगी रामानंद संप्रदायाचे जिल्ह्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी व साईनाथनगर सेवा केंद्रातील गुरु बंधू गुरु भगिनींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.आदिनाथ ससे यांच्या त्या मातोश्री होत.

# राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करा : बाळासाहेब थोरात

## संगमनेर बाजार समितीचे काम सर्वोत्तम असल्याचे गौरवोद्गार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राज्यात अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिके पाण्याअभावी जळून चालली आहेत. शेतकरी हवालदिल झाला असून पंचनाम्यांचा फार्स न करता राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी, अशी मागणी माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे काम सर्वोत्तम असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजारात विविध विकासकामांचा शुभारंभ, शेतकरी मेळावा व वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी सभापती शंकर पाटील खेमनर होते. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, ड. माधवराव कानवडे, उपसभापती गीताराम गायकवाड, सचिव सतीश गुंजाळ यांच्यासह संचालक, पदाधिकारी, शेतकरी व व्यापारी उपस्थित होते.

### तालुक्याच्या विकासासाठी रेल्वे महत्त्वाची

नाशिक-पुणे रेल्वेमार्ग संगमनेरजवळून गेल्यास तालुक्याच्या विकासाला मोठी गती मिळाली असती. जमीन अधिग्रहण करून शेतकऱ्यांना मोबदलाही देण्यात आला होता. मात्र रेल्वेमार्ग बदलल्याने तालुक्याचे नुकसान झाले. युवक व शेतमालाला देशभरात पोहोचण्याची संधी मिळाली असती. तालुक्याचे वैभव टिकवण्यासाठी आता सर्वांनी संघर्ष करण्याची गरज आहे, असे थोरात यांनी सांगितले.

थोरात यांच्या हस्ते शेतकरी सुविधा केंद्र, अंतर्गत डांबरी रस्ते तसेच लिलाव शेड क्रमांक एक व दोनचे उद्घाटन करण्यात आले. राज्यभर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे, असे थोरात म्हणाले. संगमनेर बाजार समितीने शेतकरी, व्यापारी व ग्राहकांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून ती राज्यातील सर्वोत्तम बाजार समिती म्हणून ओळखली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

निळवंडे धरण व कालवे पूर्ण झाले असून वीजपुरवठा खंडित झाल्यास पाणी पुढे नेता येणार नाही. त्यामुळे नागरिकांनी जागृत राहून प्रशासनावर दबाव ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. २२ तारखेच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# गणेशोत्सवासाठी रूट मार्च



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी टाकळीभान येथे पोलिसांचा रूट मार्च काढण्यात व आला. उत्सव काळात पोलिस यंत्रणा सज्ज असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. स. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन ,विभागीय पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर, यांचे आदेशावरून परी पोलिस उपाधीक्षक श्रीमती कल्पना पवार, पोलीस निरीक्षक अरुण धनवडे, पी. एस.आय. सतीश डवले टाकळीभान येथे रूट मार्च करण्यात आला. यावेळी गणेशोत्सव शांततेत साजरा करा गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. डीजेवर बंदी असल्याने पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीन कारवाई केली जाईल, असा इशारा परी पोलीस उपाधीक्षक श्रीमती कल्पना पवार यांन दिला. या रूट मार्च मध्ये हेडकॉन्स्टेबल रामेश्वर ढाकणे, श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन येथील २५ ते ३० पोलीस अंमलदार, २५ ठउझ जवान व १० होमगार्ड सहभागी झाले होते.

## शेड उभारण्यावरून वाद; एकावर लोखंडी रॉडने हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : टाकळीभान येथील घरासमोर पत्र्याचे शेड उभारण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका महिलेच्या अंगावर धावून जात झटापट केल्याचा, तसेच तिच्या पतीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याचा प्रकार गुरुवारी (१७ सप्टेंबर) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडला. याप्रकरणी जयश्री प्रकाश गाडेकर (वय २५, रा. टाकळीभान) यांनी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, जयश्री गाडेकर यांच्या घराशेजारी सुनील भोसले यांची फिटरची टपरी असून जागेच्या कारणावरून यापूर्वीही वाद होत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. गुरुवारी सकाळी सुनील भोसले, विकी भोसले व रॉकी भोसले हे त्यांच्या घरासमोर पत्र्याचे शेड उभारत होते. यावेळी जयश्री यांनी शेड उभारण्यास विरोध केला असता, तिघांनी शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. यानंतर रॉकी व विकी यांनी त्यांच्या अंगावर धावून येत झटापट केली. या झटापटीत रॉकीने त्यांच्या डाव्या हाताला पिरगळले, तर सुनील भोसले याने उजव्या पायावर लोखंडी रॉडने मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद सोडविला. घटनेनंतर जयश्री यांनी पती प्रकाश यांना फोन करून माहिती दिली. काही वेळाने प्रकाश गाडेकर व त्यांची आई घटनास्थळी आले.

# दुष्काळाचे सावट हटू दे, बळीराजा सुखी होवू दे

## आ. आशुतोष काळेंची विघ्नहर्त्याकडे प्रार्थना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण राज्यात चालूवर्षी समाधानकारक पाऊस पडलेला नाही. कोपरगाव मतदार संघात जवळपास मागील दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्यामुळे बळीराजाच्या चिंता वाढल्या आहेत.अस्मानी संकटाला न घाबरता बळीराजा नेहमीच मोठ्या धाडसाने व हिमतीने प्रत्येक संकटाला सामोरे गेला आहे. त्यामुळे जरी आजपर्यंत समाधानकारक पाऊस झाला नसला तरी यापुढील काळात कोपरगाव मतदार संघासह संपूर्ण राज्यात भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे सावट हटू दे आणि बळीराजा सुखी होवू दे अशी प्रार्थना सर्व गणेश भक्तांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांनी विघ्नहर्त्याच्या चरणी केली.



कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर गणेशोत्सव निमित्त आयोजित श्री.सत्यनारायण महापूजा प्रसंगी आमदार आशुतोष काळे, सौ.चैतालीताई काळे व मान्यवर.

सालाबाद प्रमाणे याहीवर्षी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर गणेशोत्सव उपसमितीच्या वतीने श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून त्यानिमित्ताने श्री.सत्यनारायण महापूजा कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या शुभ हस्ते पार पडली यावेळी ते बोलत होते. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मंडळाचे हे ७२ वे वर्ष असून त्यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

यावेळी आमदार आशुतोष काळे पुढे म्हणाले की, गणपती बाप्पा हे १४ विद्या आणि ६४ कलांचे अधिष्ठाता असून, संकटसमयी भक्तांच्या पाठीशी उभे राहणारे विघ्नहर्ते दैवत आहे. राज्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून, पिकांवर आलेले संकट आणि दुष्काळाचे सावट दूर होण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. अशा या कठीण प्रसंगी विघ्नहर्त्या गणरायाच्या चरणी कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रावर कृपादृष्टी राहावी, राज्यात सर्वदूर परतीचा दमदार पाऊस पडावा, शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि बळीराजाच्या जीवनात पुन्हा सुख-समृद्धी यावी, अशी प्रार्थना राज्यातील शेतकरी व सर्व गणेशभक्तांच्या वतीने केली आहे.

यापूर्वीही काही वर्षी सुरुवातीला जरी पाऊस पडला नाही तरी परतीच्या पावसाने कसर भरून काढलेली आहे.तसेच गणरायाच्या आशीर्वादाने कोणतेही संकट कायमचे राहत नाही; त्यामुळे विघ्नहर्ता गणपती बाप्पा शेतकऱ्यांवर आलेले हे आरिष्ट दूर करून दुष्काळाचे सावट नक्की दूर करील आणि बळीराजाच्या कष्टाला सुखाचे,समाधानाचे दिवस मिळवून देईल,असा विश्वास आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबासाहेब सय्यद, असि.सेक्रेटरी संदीप शिरसाठ, विविध विभागाचे खाते प्रमुख, गणेशोत्सव उपसमितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, कारखाना व सर्व संलग्न संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपंचायतमध्ये पथविक्रेत्यांचा लोककल्याण मेळाव्याला प्रतिसाद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पथविक्रेत्यांसाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेली जागा अपुरी पडत असल्याने बाजार तळावर पथविक्रेत्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नगरपंचायतीने निश्चित केलेल्या जागेच्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे सर्व पथविक्रेत्यांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवरच व्यवसाय करावा असे आवाहन नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी केले. पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी व पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत नेवासा शहर पथविक्रेता समितीची बैठक व लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्याधिकारी निखिल फराटे बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,अल्ताफ पठाण, परवेज पठाण, हयुमन शेख, पथविक्रेता समिति सदस्य विकास चव्हाण, सचिन गव्हाणे, राहुल भोसले, सागर गुणवंत, गणेश पंडुरे, अमित मापारी यांच्यासह सहा. प्रकल्प अधिकारी सुनील गोसावी, कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य निरीक्षक प्रकाश पुंड, सहा. कर निरीक्षक गोरक्ष काळे, रचना सहाय्यक निरंजन शहाणे, प्रताप कडपे आदी उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले म्हणाले की, रविवारचा बाजार कोणत्याही कारणाने बंद ठेवू नये. रविवारचा बाजार बंद राहिल्यास छोट्या व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते.

बाजार तळावर सर्व छोट्या व्यावसायिकांची योग्य सोय करण्यात येणार आहे. त्यामुळे छोट्या व्यावसायिकांनी नगरपंचायतीने निश्चित केलेल्या व्यावसायिक जागेवरच व्यवसाय करावा, असे सांगितले. सहा. प्रकल्प अधिकारी सुनील गोसावी यांनी उपस्थित पथविक्रेते व नागरिकांना पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड आणि 'स्वनिधी से समृद्धी' योजनांबाबत सविस्तर माहिती देऊन जनजागृती केली. नेवासा नगरपंचायत हद्दीत व्यवसाय करणाऱ्या स्थिर व फिरत्या पथविक्रेत्यांना बँकांमार्फत उपलब्ध होणाऱ्या कर्ज सुविधे बाबत मार्गदर्शन करण्यात आले. पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत प्रथम कर्ज १५ हजार, द्वितीय कर्ज २५हजार आणि तृतीय कर्ज ५० हजार अशा कर्ज सुविधांची माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी क्यूआर कोडद्वारे डिजिटल पेमेंट स्वीकारण्याचे महत्त्व सांगण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना व्याज अनुदानाचा लाभ तसेच पुढील टप्प्यातील कर्ज व क्रेडिट कार्ड सुविधेबाबतही माहिती देण्यात आली.या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, बँकेमार्फत होणारी कर्ज प्रक्रिया आणि डिजिटल व्यवहारांचे महत्त्व याबाबत पथविक्रेते व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीत गणेश पंडुरे, अमित मापारी, विकास चव्हाण, सागर हारदे, अमोल असणे, डॉ. सागर गुणवंत आदींनी चर्चेत सहभाग घेत विविध सूचना मांडल्या. नेवासा नगरपंचायत हद्दीतील पीएम स्वनिधी योजनेचे कामकाज शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी पदाधिकारी व अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# गणेशोत्सवात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी लोणी पोलिसांची धडक कारवाई

## ३५ जण १४ दिवसांसाठी हद्दपार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, यासाठी लोणी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध प्रकरणांमध्ये पोलिसांच्या रेकॉर्डवर असलेल्या ३५ इसमांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांना १४ दिवसांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात वाद, भांडणे अथवा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दि. २३ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संबंधित इसमांना हद्दपार करण्यात आले आहे. या कारवाईमुळे गणेशोत्सव काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यास मदत होणार असून सार्वजनिक ठिकाणी अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ममदापूर, कोल्हार बुद्रुक, चांडेवाडी आदी परिसरातील संबंधित व्यक्तींवर ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून गस्त, बंदोबस्त आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. गणेशोत्सव हा सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचा उत्सव असल्याने गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी ध्वनिप्रदूषण, वाहतूक नियम, मिरवणुकीचे नियोजन, सार्वजनिक सुव्यवस्था आणि कायद्याचे पालन याबाबत आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

तसेच सोशल मीडियावरून अफवा, आक्षेपार्ह संदेश किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट प्रसारित करू नयेत. कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असेही पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन लोणी पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# राहाता शहर स्वच्छ, सुंदर करण्याच्या दिशेने पालिकेचे पाऊल

## नगरपरिषदेचा २० टनी वजन काटा कार्यान्वित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : 'स्वच्छ राहाता, सुंदर राहाता' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राहाता नगरपरिषदेने २० टनी अत्याधुनिक वजन काटा कार्यान्वित केला आहे. शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या वजन काट्याचे उद्घाटन नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांच्या हस्ते झाले.

नगरपरिषदेकडे स्वतःचा वजन काटा नसल्याने गोळा केलेला घनकचरा मोजण्यासाठी वाहनांना शहराबाहेर सुमारे २० किलोमीटर अंतरावर जावे लागत होते. त्यामुळे वेळ आणि इंधनाचा अतिरिक्त खर्च होत होता.



ही अडचण दूर करण्यासाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी पुढाकार घेऊन नगरपरिसरातच वजन काटा उभारण्याचा निर्णय घेतला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. वजन काट्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, प्रत्येक वाहनाच्या वजनाची अचूक नोंद ठेवली जाणार आहे. यामुळे कचरा व्यवस्थापनात पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे.

या सुविधेमुळे पालिकेचा वेळ व इंधनाचा खर्च वाचणार असून, शहर स्वच्छ ठेवण्याच्या प्रयत्नांना गती मिळणार असल्याचे नगराध्यक्ष डॉ. गाडेकर यांनी सांगितले.

यावेळी उपनगराध्यक्ष डॉ. विजय सदाफळ यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

# द • ख • ल

## मळगंगा प्रसादालयाला ११ हजार १११ रुपयांची देणगी

**निघोज :** कुलाबा ( मुंबई ) येथील रामभरोसे हॉटेलचा वर्धापन दिन अतिशय साध्यापणाने साजरा करण्यात आला. मात्र मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाला रामभरोसे हॉटेलचे संचालक तसेच जी एस महानगर बँकेचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांनी वर्धापनदिन निमित्ताने ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली आहे. कवाद यांचे आजोबा भागुजी गोविंदा कवाद यांनी १९३९ वर्षी हे हॉटेल सुरू केले. रामभरोसे हॉटेलच्या जवळच असणाऱ्या मच्छीबंदर वरील कोळी तसेच अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील मच्छी व्यवसायीकांची नाष्टा व चहापाणी व्यवस्था होण्यासाठी कवाद यांनी हे हॉटेल सुरू केले. त्यानंतर भागुजी कवाद यांचे चिरंजीव जनार्दन कवाद व बाबासाहेब कवाद यांनी या हॉटेलचे नुतनीकरण करीत हॉटेलचा नावलौकिक वाढवीला. साधारण १९६० च्या दरम्यान बँकेची संख्या कमी होती. तसेच बहुताश मच्छी व्यवसायीक बँकेत पैसे ठेवण्यापेक्षा तेच पैसे पुडीत ठेऊन हॉटेलचे संचालक बाबासाहेब कवाद यांच्याकडे देत असत कवाद हे त्या पुडीवर संबधीतांचे नाव टाकून ती पुडी हॉटेलच्या गल्यात एक बाजूला ठेवीत असत. अशा प्रकारे रामभरोसेवर हजारो कुटुंबाचा विश्वास जडला होता. त्यानंतर सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व बाबासाहेब कवाद यांनी अहमदनगर बँकेची स्थापना केली व त्यानंतर याच बँकेत हजारो व्यवसायीकांना कवाद यांनी खाते उघडून दिले. या हॉटेलची जबाबदारी आज दादाभाऊ जनार्दन कवाद व भास्कर बाबासाहेब कवाद समर्थपणे संभाळीत असून आजही पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील लोक मुंबईत गेल्यानंतर चला रामभरोसे हॉटेलमध्ये जाऊ असा या हॉटेलचा नावलौकिक सर्वत्र झाला आहे.

## हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने 'हनुमान अंश' चित्रपट रविवारी दाखविणार

**अहिल्यानगर :** गणेशोत्सवानिमित्त बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिर परिसरात हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने 'हनुमान अंश' हा चित्रपट मोठ्या स्क्रीनवर रविवारी, दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता दाखविण्यात येणार आहे. नागरिक व भाविकांसाठी हा चित्रपट विनामूल्य दाखविण्यात येणार असून, परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चित्रपटाचा आनंद घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'हनुमान अंश' चित्रपटाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्री हरिहरेश्वर महादेव मंदिर परिसरात मोठ्या स्क्रीनवर हा चित्रपट दाखविण्यात येणार असल्याने भाविक व नागरिकांसाठी हा विशेष आकर्षणाचा कार्यक्रम ठरणार आहे. रविवारी सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण श्री हरिहरेश्वर महादेव मंदिर, बागरोजा हडको, दिल्ली गेट, अहिल्यानगर असे आहे.

## गणेश विसर्जनासाठी महापालिका प्रशासनातर्फे २० ठिकाणी कृत्रिम कुंडाची व्यवस्था

**अहिल्यानगर :** लाडक्या गणरायाला अत्यंत भक्तीभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात निरोप देण्यासाठी महापालिका प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. शहरातील प्रमुख ठिकाणी विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहेत. शुक्रवार (दि. २५ )रोजी गणेश विसर्जन होणार आहे. त्यासाठी जोरात तयारी महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. नगर कल्याण रोड येथील बाळाजी बुवा विहीर, सावेडी पाईपलाईन रोड यशोदा नगर विहीर, साईनगर भोसले आखाडा बुरुडगाव रोड येथील आरसीसी हाऊस ही सालाबाद प्रमाणे पारंपारिक विसर्जन ठिकाणी आहेत.बोलेगाव साईनगर ओपन स्पेस, सावेडी निर्मल नगर साईबाबा मंदिर खुली जागा, सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान, झारेकर गल्ली समोर मोकळ्या जागेत, केडगाव देवी मंदिरासमोरील जागा, भूषण नगर पाण्याच्या टाकी शेजारी केडगाव, सारस नगर भिंगार नाला पुलाशेजारी, शिवनेरी चौक स्टेशन रोड, गोविंदपुरा यशवंत माध्यमिक विद्यालय, भिस्तबाग महालाजवळ दोन ठिकाणी, गांधी मैदान पटांगण, दाणे डबरा, पांजरा पोळ पटांगण, मार्केट यार्ड मोती नगर खुली जागा, केडगाव बोलेगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पाठीमागे, ताठे मळा पंपिंग स्टेशन रोड कृषी कार्यालयाजवळ, नगर दौंड रोडवर हनुमान नगर येथील मोकळी जागा अशा विविध ठिकाणी विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहेत. तसेच गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य मार्गावर असलेले खड्डे बुजविण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कारवाई सुरू केली आहे.

## अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारात २१ सप्टेंबरला गुरुपुरब सोहळा

**अहिल्यानगर :** तारकपूर येथील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा येथे बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरबनिमित्त रविवार, दि. २० सप्टेंबर आणि सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यात आरती, गुरबाणी कीर्तन, शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा तसेच गुरू का लंगर आदी कार्यक्रम होणार आहेत. बाबा श्रीचंद महाराज हे श्री गुरु नानक देव जी यांचे ज्येष्ठ सुपुत्र असून उदासी परंपरेचे संस्थापक म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. उपलब्ध ऐतिहासिक स्रोतांनुसार त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १४९४ रोजी सुलतानपूर लोधी येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्म, योग, साधना आणि वैराग्याची ओढ होती. पुढे त्यांनी उदासी परंपरेच्या माध्यमातून अध्यात्मिक विचारांचा प्रसार केला. बाबा श्रीचंद महाराजांनी विविध प्रदेशांत भ्रमण करून अध्यात्म, ज्ञान, साधना आणि मानवकल्याणाचा संदेश दिल्याची परंपरा आहे. त्यांच्या परंपरेशी संबंधित अनेक डेरे, आश्रम, गुरुद्वारे आणि धार्मिक केंद्रे पुढे देशाच्या विविध भागांत निर्माण झाली. त्यांच्या जीवनाशी संबंधित बारठ साहिबसह अनेक स्थळांना आजही धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे.

## सत्तुरचा धाक दाखवून रोख रक्कम लुटली

**अहिल्यानगर :** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका युवकाला लोखंडी सत्तुरचा धाक दाखवून त्याच्या खिशातील ५ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम बळजबरीने लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी संतोष गोवर्धन पवार हे त्यांच्या मोटारसायकलवरून अलमगिरकडून मोरे वस्तीकडे जात होते. त्यावेळी आरोपींनी पाठीमागून विना नंबरच्या निळ्या रंगाच्या ऍक्सेस मोपेड गाडीवरून येऊन त्यांची गाडी अडवली. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यांच्या खिशाला लोखंडी सत्तुर लावून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला खाली पाडून त्यांच्या पँटच्या खिशातील ५ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली आणि घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी संतोष गोवर्धन पवार यांच्या फिर्यादीवरून सनी शंकर निकाळजे, अभि वाघेला आणि विकी भालेराव (सर्व रा. भिंगार, अहिल्यानगर) या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टपरसे व सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी घटनास्थळाला भेट दिली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पावसासाठी श्री विशाल गणपतीला साकडे!

## माळीवाड्यात आ. जगताप यांच्या हस्ते महाआरती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, गणेशोत्सवानिमित्त मंदिरात धार्मिक वातावरणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवानिमित्त आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते श्री विशाल गणपतीची भक्तिभावाने व मंगलमय वातावरणात महाआरती करण्यात आली.

यावेळी आ. संग्राम जगताप यांनी श्री विशाल गणपतीच्या चरणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडू दे, शेतकरी सुखी-समाधानी होऊ दे, अशी प्रार्थना केली. सध्या पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. हवामान खात्याचे अंदाजही अनेकदा चुकत असून, त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर श्री विशाल गणपतीकडे पावसासाठी साकडे घातल्याचे त्यांनी सांगितले.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, श्री विशाल गणपती मंदिर हे अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत असून, दररोज मोठ्या संख्येने भाविक देवदर्शनासाठी येथे येत असतात. गणेशोत्सवाच्या काळात देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून विविध धार्मिक, आध्यात्मिक



तसेच समाजोपयोगी उपक्रम राबवून ते गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाते.

श्री विशाल गणपती मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असून, मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासह विकासकामेही सुरू आहेत. या परिसराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून, या विकासकामांमध्ये नगरवासीयांचे मोठे योगदान आहे. श्री विशाल गणपतीच्या आशीर्वादाने या ठिकाणी चांगले कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

ट्रस्टच्या माध्यमातून धार्मिक कार्यासोबतच आरोग्य तपासणीसह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. याच अनुषंगाने गणेशोत्सवानिमित्त दंतचिकित्सा शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. मंदिरात झालेल्या महाआरतीच्या धार्मिक सोहळ्यामुळे मन प्रसन्न झाल्याचे आ. संग्राम जगताप यांनी सांगितले. नगरवासीयांनी आनंदाने व मोठ्या उत्साहात पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहनही आ. संग्राम जगताप यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त श्री विशाल गणपती मंदिरात झालेल्या महाआरतीप्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ड. अभय आगरकर, पंडित खरपुडे, अशोक कानडे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिकराव विधाते, नितीन पुंड, विजय कोथंबीर नगरसेवक दत्ता गाडळकर आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परजिल्ह्यातील अवैध-स्क्रॅप रिक्षांवर कारवाई करा; रिक्षा संघटनेची मागणी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरात व जिल्ह्यात परजिल्ह्यातून आलेल्या प्रायव्हेट, स्क्रॅप तसेच विनापरवाना (बिगर परमीट) धावणाऱ्या रिक्षांवर कारवाई न करता केवळ परवानाधारक (परमीटधारक) रिक्षाचालकांवरच आरटीओ आणि शहर वाहतूक शाखा रिक्षा जप्त करून दंडात्मक कारवाई करत असल्याचा तीव्र संताप रिक्षा संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

यासंदर्भात 'अहमदनगर जिल्हा रिक्षा पंचायत' आणि 'प्रजा चालक-मालक संघटना' यांच्यासह अन्य रिक्षा संघटनांच्या वतीने शहर वाहतूक शाखेच्या पोलीस अधीक्षक तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी (ठढज) यांना निवेदन देण्यात आले यावेळी प्रजा चालक-मालक रिक्षा संघटनेचे ज्ञानेश्वर बारस्कर, उपाध्यक्ष भैय्या पठाण, अहमदनगर जिल्हा रिक्षा पंचायतचे समीर कुरेशी, कार्याध्यक्ष गुलाम दस्तगीर, सचिव विष्णू आंबेकर, शाकीर पठाण, कलीम पठाण, अभय पतंगे, हाजी फैरोज शेख, विजू शेलार, निर्मल गायकवाड, गणेश आखमोडे, विशाल खांडरे, अन्वर शेख, जावेद शेख, फुजेल कुरेशी, शकील शेख आदीसह रिक्षा संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुकुंदनगरमध्ये 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान

### आयुक्त डांगे यांनी घरोघरी जाऊन केली पाणीसाठ्यांची तपासणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या वतीने मुकुंदनगर परिसरात 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आतापर्यंत शहरातील सुमारे ८ हजार घरांना भेटी देऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंग्यू आजाराबाबत घ्यावयाची काळजी आणि उपाययोजनांची माहिती पथनाट्याद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.



यावेळी बोलताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानामध्ये नागरिकांनी सहभागी होऊन आपले घर तसेच परिसर स्वच्छ ठेवावा. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा.

शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शहरात डेंग्यू आजाराबाबत घ्यावयाची काळजी तसेच आवश्यक उपाययोजनांसंदर्भात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या वतीने आतापर्यंत ८ हजार घरांना भेटी देऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली आहे. आतापर्यंत शहरात डेंग्यूचे सहा रुग्ण आढळले आहेत, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

यावेळी नगरसेवक शेहबाज हाजी सय्यद यांनी डेंग्यू आजाराबाबत घ्यावयाची काळजी व उपाययोजनांसंदर्भात माहिती दिली. माजी नगरसेविका नसीम शेख आणि डॉ. जहीर मुजावर यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्या कामाचे कौतुक करताना आयुक्त थेट जनतेमध्ये जाऊन काम करत असल्याचे सांगितले.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान सुरू करण्यात आले असून, या माध्यमातून मुकुंदनगर परिसर डेंगूमुक्त करण्यासाठी नागरिकांमध्ये सातत्याने जनजागृती केली जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

डॉ. सृष्टी बनसोडे म्हणाल्या की, 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा हा आठवा आठवडा आहे. विद्यार्थी, आरोग्य सेविका आणि आशा सेविकांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी केली जात आहे.

## पारंपरिक सण-उत्सवातून संस्कृतीचे जतन : झिकरे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सण-उत्सव आणि धार्मिकतेची मोठी परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात विविध सणांच्या माध्यमातून संस्कृती व परंपरांचे जतन केले जाते. याच पारंपरिक परंपरेनुसार उज्वला झिकरे यांच्या कुटुंबीयांच्या वतीने गौरी-गणपतीचे धार्मिक उत्साहात स्वागत करण्यात आले. गौरी-गणपतीच्या आगमनानिमित्त घरामध्ये आकर्षक सजावट, रांगोळी तसेच पारंपरिक पद्धतीने देखाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंढरपूर यात्रा वारीचा देखावा साकारण्यात आला असून, श्री विठ्ठल-रुक्माईच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



यावेळी बोलताना रमा झिकरे म्हणाल्या की, आपल्याला सण-उत्सवांची तसेच धार्मिकतेची मोठी परंपरा लाभली आहे. या सण-उत्सवांच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे जतन होत असते. गौरी-गणपतीच्या आगमनानिमित्त पारंपरिक पद्धतीने सजावट, रांगोळी तसेच विविध देखाव्यांचे आयोजन केले जाते. गौरी-गणपतीच्या आगमनाला धार्मिकतेचा मोठा वारसा असून, तो जपण्याचे काम केले जात आहे.

यंदा गौरी-गणपतीच्या आगमनानिमित्त पंढरपूर यात्रा वारीच्या देखाव्याचे आयोजन करण्यात आले. आपल्या लाडक्या गणरायासोबत आपल्या घरी माता गौरी अर्थात महालक्ष्मीचे आगमन होत असते. जसे गणपती बाप्पा आपल्या घरी सर्व विघ्ने दूर करण्यासाठी येतात, तसेच माहेरवाशिणीच्या रूपाने येणारी गौराई आपल्या घरात सुख, शांती आणि समृद्धी घेऊन येते. गौरीच्या पावलांनी घरात चैतन्य व आनंद पसरतो.

गौरी-गणपतीचा हा सण आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा तसेच नात्यांमधील प्रेमाचा गोडवा वाढवणारा आहे. झिकरे कुटुंबीयांची चार पिढ्यांची ही परंपरा असून, ती पुढे घेऊन जाण्याचे काम आम्ही करत असल्याचे रमा झिकरे यांनी सांगितले.

गौरी-गणपती उत्सवानिमित्त उज्वला झिकरे कुटुंबीयांच्या वतीने मोठ्या उत्साहात गौरी-गणपतीचे आगमन करण्यात आले. यावेळी विधिवत महाआरती करण्यात आली. महाआरतीप्रसंगी उज्वला झिकरे, रमा झिकरे, प्रगती झिकरे, अनुश्री झिकरे, मोनिका झिकरे आदी उपस्थित होत्या.

## मोहट्यातील शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** मोहटे गावातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध शासकीय पदांवर नियुक्त झालेल्या गुणवान युवक-युवतींचा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. गावातील या 'यशस्वी हिऱ्यांचा' सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ग्रामस्थांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. मारुती दहिफळे, मयूर दहिफळे, म्हातारदेव खाडे, अंबादास दहिफळे, प्रशांत दहिफळे, सुरज घुगे, सोनाली घुगे, सीमा दहिफळे आणि प्रियंका पालवे यांची प्राथमिक शिक्षकांसह विविध शासकीय पदांवर नव्याने नियुक्ती झाली आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात मिळविलेले हे यश गावासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आजच्या स्पर्धेच्या युगात मर्यादित शासकीय नोकऱ्या आणि मोठ्या संख्येने स्पर्धक असताना या युवक-युवतींनी मिळविलेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून त्यांच्या कुटुंबाच्या प्रगतीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी तसेच आई-वडिलांचा त्याग आहे. त्यामुळे आपल्या गावातील लेकरांनी शासकीय सेवेत प्रवेश मिळविल्याचा आनंद व्यक्त करताना अनेक ग्रामस्थ भावूक झाले. काही वक्त्यांच्या भावना व्यक्त करताना कंठ दाटून आला, तर डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश गावातील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल. शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि शासकीय सेवेकडे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अधिक आत्मविश्वासाने पाहावे, असा संदेश या सन्मान सोहळ्यातून देण्यात आला. यावेळी उपस्थित : उपसरपंच अविनाश फुंदे, संदीप पालवे, मारुती खाडे, बाबासाहेब दहिफळे, पोपट खाडे, श्रीधर गिरी, रामकिसन फुंदे, शामराव दहिफळे, सरपंच मनिषा पालवे, पांडुरंग फुंदे, अंबादास पालवे, पांडुरंग दहिफळे, मारुती दहिफळे, अजय आव्हाड, अक्षय गोसावी, अक्षय दहिफळे, रामदास दहिफळे, देविदास दहिफळे, भगवान दहिफळे, मंदाबाई दहिफळे, शिवाजी पालवे, चंद्रकांत पालवे, राजेंद्र पालवे, अविराम दहिफळे, भास्कर दहिफळे, भीमराव दहिफळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'आपत्तीमुक्त, सुरक्षित समाजाकडे' संदेश देणारा गौरी-गणपतीचा देखावा

## जुन्या वस्तूंच्या पुर्नवापरातून पर्यावरणपूरक सजावट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सावेडी येथील राजेश परदेशी यांच्या निवासस्थानी दरवर्षी गौरी-गणपती उत्सवानिमित्त सामाजिक विषयावर आधारित देखावा साकारला जातो. यंदा 'आपत्तीमुक्त, सुरक्षित समाजाकडे' ही संकल्पना घेऊन नैसर्गिक आपत्तीच्या काळात सज्ज, सुरक्षित व संवेदनशील समाज निर्माण करण्याचा संदेश देणारा देखावा साकारण्यात आला आहे.

या देखाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे घरातील जुन्या व वापरात नसलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून 'टाकाऊ वस्तूंपासून सर्जनशीलता' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात आली आहे. त्यामुळे सजावट आकर्षक असण्याबरोबरच पर्यावरणपूरक आणि जनजागृती करणारी ठरली आहे.

देखाव्याच्या मध्यभागी महापुराचे वास्तवदर्शी दृश्य साकारण्यात आले आहे. कापसाच्या माध्यमातून पुराचे पाणी व त्याची तीव्रता दाखवण्यात आली असून, त्यामध्ये नागरिक, लहान मुले आणि प्राणी अडकलेले दाखवले आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) पथकाकडून बोटीच्या साहाय्याने, हेलिकॉप्टरद्वारे तसेच दोराच्या माध्यमातून बचावकार्य केले जात



असल्याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले आहे.

देखाव्याच्या एका बाजूला एनडीआरएफचे कार्यालय दाखवून आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तातडीचे बचावकार्य आणि आपत्तीनंतरची मदत यामध्ये प्रशिक्षित बचाव पथकांची भूमिका अधोरेखित केली आहे. तर पूरग्रस्तांसाठी सुरक्षित निवारा, रुग्णालयीन सुविधा तसेच अन्न, वस्त्र व आवश्यक साहित्याच्या मदत संचांचे वितरण दाखवून संकटाच्या काळात समाजाने एकमेकांच्या मदतीला धावून जाण्याचा संदेश दिला आहे.

नदी-नाल्यांमध्ये टाकण्यात येणारे प्लास्टिक व कचरा यामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन काही परिस्थितीत पूरस्थिती गंभीर होण्यास हातभार लागू शकतो, याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. 'नदीत कचरा टाकू नका-नदीचा नैसर्गिक प्रवाह जपूया' असा संदेश देण्यात आला आहे. तसेच 'पूरस्थितीत काय करावे?', 'आपत्तीपूर्व तयारी' आणि 'एनडीआरएफचे कार्य' याबाबत जनजागृती करणारी माहितीपत्रकेही लावण्यात आली आहेत. हा देखावा साकारण्यासाठी राजेश परदेशी यांच्या पत्नी निलम, कन्या साजरी आणि आई बिजला यांनी अथक परिश्रम घेतले. हा उपक्रम सर्व नागरिकांसाठी खुला असून नागरिकांनी आवर्जून भेट देऊन सामाजिक संदेश देणारा हा देखावा पाहावा, असे आवाहन परदेशी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. 'सजावट जुन्या वस्तूंपासून, संदेश नव्या विचारांचा आणि संकल्प-आपत्तीमुक्त, सुरक्षित समाजाचा!' हा या उपक्रमाचा मुख्य संदेश आहे.

## द • ख • ल

### सेवा संकल्प अभियान नागरिकाभिमुख करा

**पुणे :** 'सेवा संकल्प अभियान' केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता पात्र नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून द्यावा. अभियानातील सर्व उपक्रमांचे सूक्ष्म नियोजन करून ते कालबद्ध पद्धतीने राबवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान राज्यात हे अभियान राबविण्यात येत आहे. अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोकसहभागातून सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरांचे आयोजन करून पात्र नागरिकांना विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावा. 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शक्य त्या सेवा शिबिराच्या ठिकाणीच उपलब्ध करून द्याव्यात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरांचे आयोजन करावे, असे निर्देश डुडी यांनी दिले. वन हक्क दाव्यांबाबत ग्राम, तालुका व जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठका घेऊन नवीन दावे व प्रलंबित दाव्यांमधील दुरुस्तीची कार्यवाही गतिमान करावी. मंजूर दाव्यांनुसार अधिकार अभिलेख तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करून प्रलंबित दावे अभियान कालावधीत निकाली काढावेत. 'सेवा सेतू' शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा मोहीम, स्वामित्व सनद, पाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, नळ व वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंद, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचतगट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ व ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा देण्यासाठी पूर्वतयारी करावी.

### बाप्पा डॉट ऑर्गवर गणेशोत्सवाच्या पाच कथा

**पुणे :** सांस्कृतिक कार्य विभागाच्या 'घरोघरी बाप्पा' उपक्रमांतर्गत महाराष्ट्राच्या डिजिटल सांस्कृतिक संग्रह पोर्टल असलेल्या 'बाप्पा डॉट ऑर्ग'वर गणेशोत्सवातील पाच वैशिष्ट्यपूर्ण कथांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुण्यातील नव्या घरातील पहिला गणेशोत्सव, गुहागरमधील पारंपरिक गौरी-गणपती प्रथा, घरच्या घरी मातीची मूर्ती तयार करण्याचा उपक्रम, व्हिएतनाममधील विद्यार्थ्यांचा गणेशोत्सव आणि विसर्जनाच्या मातीतून वृक्षसंवर्धन या उपक्रमांचा समावेश आहे. पुण्यात संजय मंगलाराम यांच्या कुटुंबाने नव्या घरात प्रथमच गणरायाची प्रतिष्ठापना केली. कुटुंबातील दोन मुलींनी पूजा व आरतीची जबाबदारी सांभाळत परंपरेचा वारसा पुढे नेला. गुहागर परिसरातील महिलांकडून गौरीची मूर्ती, पूजेचे साहित्य घेऊन भातशेती व पाणवाटांमधून सामूहिक मार्गक्रमण करण्याची पारंपरिक प्रथा जपली जात आहे. निकिता जे. पांचाळ यांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी कच्च्या मातीपासून घरच्या घरी गणेशमूर्ती तयार करून स्वतः रंगकाम केले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचीही निवड झाली आहे. व्हिएतनाममध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा केला. उपलब्ध साहित्याच्या मर्यादेत विद्यार्थ्यांनी स्वतः मोदक तयार करून मित्रांनाही उत्सवात सहभागी करून घेतले. ईश्वर मनोहर बोरसे, नोंदकर्ता यांनी ही कथा पोर्टलवर नोंदविली आहे. पराग नारायण शेठ गुजराथी यांच्या कुटुंबात गेल्या ६५ वर्षांपासून गणेशोत्सव साजरा केला जातो. मागील सहा वर्षांपासून मातीच्या मूर्तीचे घराच्या गच्चीवर विसर्जन करून त्याच मातीत रोपे लावली जातात. पाच फुटांपेक्षा अधिक वाढ झाल्यानंतर ही रोपे नदीकाठ व डोंगर परिसरात लावली जात असून, आतापर्यंत ३० हून अधिक वृक्षांचे संवर्धन करण्यात आले आहे.

### पुणे महोत्सव राज्यातील नंबर एकचा करू : आशिष शेलार

**पुणे :** गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने या उत्सवाची सांस्कृतिक व्याप्ती अधिक व्यापक झाली आहे. पुण्याच्या सांस्कृतिक समृद्धीची देश-विदेशात ओळख निर्माण करण्यासाठी पुढील वर्षी 'पुणे महोत्सव' हा राज्यातील नंबर एकचा महोत्सव करण्याचा प्रयत्न करू, असे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. शनिवारवाड्याच्या ऐतिहासिक प्रांगणात सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार हेमंत रासने, आमदार राजेश पांडे, सांस्कृतिक कार्य विभागाचे श्रीपाद अष्टेकर, कलाकार अथर्व सुधामे आदी उपस्थित होते. पुणे हे विद्येचे, संस्कृतीचे आणि ऐतिहासिक वारशाचे माहेरघर आहे. सांस्कृतिक महोत्सवाला पुणेकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा पुण्याच्या सांस्कृतिक समृद्धीचा दाखला आहे. गणेशोत्सवातील सहभागिता, सामाजिक व राष्ट्रप्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, देखावे आणि विविध परंपरांमुळे या उत्सवाचे स्वरूप व्यापक झाले आहे. त्यामुळे गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे शेलार यांनी सांगितले. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्याची मागणी आमदार हेमंत रासने यांनी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर विधानसभेच्या पटलावर निर्णय घेऊन गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला, असे शेलार यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या घरगुती व सार्वजनिक परंपरा, कथा, आठवणी आणि सांस्कृतिक उपक्रम नागरिकांनी 'लर्रिरि.ीस' या व्यासपीठावर नोंदवावेत, असे आवाहनही त्यांनी केले. गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा जगभर पोहोचविण्यासोबतच युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारशासाठी आवश्यक सांस्कृतिक दस्तऐवजीकरण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# औषध सुरक्षा कायदा लागू करा

## रुग्णालयीन बिलांचे ऑडिट करा : उमेश चव्हाण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** औषधांच्या किमतीतील पारदर्शकता, रुग्णालयीन बिलांचे नियमित शासकीय लेखापरीक्षण आणि रुग्णांच्या आर्थिक हक्कांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी, अशी मागणी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी केली. येत्या तीन महिन्यांत औषध सुरक्षा कायदा लागू न झाल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

रुग्णालयांमध्ये उपचारांचा वाढता खर्च, महागडी औषधे आणि विविध शुल्कांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत आहे. काही रुग्णालयांकडून रुग्णांना त्यांच्याच फार्मसीमधून औषधे घेण्याची सक्ती केली जाते. त्यामुळे जीवनावश्यक व जीवनरक्षक औषधांची उपलब्धता आणि किमतीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी स्वतंत्र औषध सुरक्षा कायदा करावा, अशी मागणी चव्हाण यांनी केली.

औषधांची खरेदी किंमत, छापील कमाल किरकोळ किंमत आणि अंतिम विक्री किंमत याबाबत स्पष्टता असावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद कायद्यात करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

जनरल वॉर्ड, अतिदक्षता विभाग, विशेष कक्ष तसेच अन्य विभागांतील रुग्णालयीन बिलांचे नियमित शासकीय लेखापरीक्षण करावे. नियमबाह्य आकारणी आढळल्यास अतिरिक्त रक्कम संबंधित रुग्णाला परत मिळण्याची व्यवस्था करावी. औषधे, तपासण्या, प्रक्रिया, बेड आणि डॉक्टरांच्या शुल्कासह प्रत्येक बाबीचा तपशील असलेले बिल देणे बंधनकारक करावे, अशी मागणी परिषदेतर्फे करण्यात आली.

धर्मादाय रुग्णालयांचे नियमित सामाजिक लेखापरीक्षण करून मोफत व सवलतीच्या खाटांची माहिती सार्वजनिक करावी. शासनाने येत्या ३० दिवसांत याबाबत ठोस कृती आराखडा जाहीर करावा; अन्यथा राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा चव्हाण यांनी दिला. या वेळी रुग्ण हक्क परिषदेचे केंद्रीय सचिव डॉ. स्वानंद पंडित, पुणे शहर अध्यक्ष अपर्णा मारणे-साठ्चे आणि महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक शिंदे उपस्थित होते.



## परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय साधून सांस्कृतिक वारसा जपावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधत विकासाची वाटचाल करताना भाषा, कला, संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचा समृद्ध वारसा जपणे आवश्यक आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासासोबत सांस्कृतिक मुळांशी नाते दृढ ठेवणे ही विकसित भारताची ओळख आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

स्वारगेट येथील श्री गणेश कला-क्रीडा रंगमंच येथे पुणे फेस्टिव्हलच्या ३८ व्या पर्वाचे उद्घाटन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार हेमा मालिनी, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, चेअरमन मीरा कलमाडी आदी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ कलाकार मोहन जोशी यांना उपराष्ट्रपतींच्या हस्ते 'पुणे फेस्टिव्हल जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.



पुणे हे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असून पुणे फेस्टिव्हलने कला, संस्कृती, संगीत, नृत्य, साहित्य, क्रीडा आणि पर्यटन क्षेत्राला एकत्र आणत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. यंदाच्या महोत्सवात २१ देशांतील विद्यार्थ्यांचा सहभाग असून, त्यातून विविध संस्कृती व परंपरांमधील सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना मिळत असल्याचे उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी सांगितले.

विकासाचा अर्थ केवळ पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि आर्थिक वाढ एवढाच नसून संस्कृती, भाषा, परंपरा आणि कलांचे संवर्धनही त्याचा महत्त्वाचा भाग आहे. आधुनिक शहरे उभारताना त्यांचा सांस्कृतिक आत्मा जपणे आणि नव्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देतानाच परंपरेचा सन्मान करणे आवश्यक आहे. पुणे फेस्टिव्हलसारखे उपक्रम स्थानिक कलाकार, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला संधी उपलब्ध करून देतात, असे त्यांनी नमूद केले.राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटनाला जागतिक स्तरावर चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. पुणे फेस्टिव्हलला भविष्यात आणखी विस्तार देऊन जागतिक सांस्कृतिक महोत्सव म्हणून विकसित करण्याची क्षमता असल्याचे त्यांनी नमूद केले. गणेशोत्सवाला 'महाराष्ट्राचा उत्सव' म्हणून अधिकृत मान्यता देण्यात आली असून पुणे फेस्टिव्हल विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पुणे फेस्टिव्हलने गायन, वादन, नृत्य, शास्त्रीय संगीत, लोककला, नाट्य, साहित्य, क्रीडा आणि पर्यटन क्षेत्रातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. मोठ्या कलाकारांसोबत नवोदित कलाकारांना संधी, महिला महोत्सव, लावणी महोत्सव, चित्रकला, नृत्य, पाककला, मेहंदी आणि विविध स्पर्धा ही महोत्सवाची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. पुणे फेस्टिव्हलसाठी शासनाच्या माध्यमातून सर्व सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

## घरात घुसून ज्येष्ठ महिलेवर हल्ला; दागिने, रोकड लंपास



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील आमदाबाद येथे घरात झोपलेल्या ज्येष्ठ महिलेवर हल्ला करून चोरट्यांनी तीन तोळे दागिने आणि ५० हजार रुपये रोख लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी दोन चोरट्यांविरुद्ध शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठकुबाई थोरात या घरात झोपलेल्या असताना रात्री दीडच्या सुमारास दोन चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कुऱ्हाडीच्या दांड्याने त्यांना मारहाण करून घरातील मौल्यवान वस्तू देण्याची धमकी दिली. घाबरलेल्या थोरात यांनी पेटी व कपाटात ठेवलेले तीन तोळे दागिने आणि ५० हजार रुपये चोरट्यांच्या ताब्यात दिले.

त्यानंतर चोरट्यांनी थोरात यांचे हात-पाय बेडशीटने बांधून घटनास्थळावरून पलायन केले. या घटनेची फिर्याद ठकुबाई थोरात यांनी शिरूर पोलिस ठाण्यात दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## गौराईंपुढे देखाव्यांची परंपरा वाढतेय



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** गणेशोत्सवानंतर गौराईंचे उत्साही आगमन झाले असून, सासवड शहरात गौराईंपुढे विविध विषयांवरील आकर्षक देखावे उभारण्याची परंपरा वाढत आहे. समाजप्रबोधन, पौराणिक कथानक, पर्यावरण संवर्धन यासह समकालीन विषयांवर महिला व मुलींकडून कल्पकतेने देखावे साकारले जात आहेत.

सध्या चर्चेत असलेल्या डीजे बंदीच्या पार्श्वभूमीवर डॉ. भाग्यश्री प्रशांत बोरावके यांनी डीजेमुळे होणारा सर्वसामान्यांना त्रास आणि डीजे बंदीचा संदेश देणारा देखावा साकारला आहे. दीपाली संतोष जगताप यांनी पुस्तकांची आकर्षक मांडणी करून महर्षी व्यास यांनी सांगितलेले आणि गणपतीने लिहिलेले महाभारत या विषयावर देखावा उभारला आहे.

माधुरी जगदीशचंद्र शिंदे यांनी गणेश व गौराईंचा नौकाविहार सुंदररीत्या साकारला आहे. सोपानदेव मंदिर परिसरातील भारती संजय चव्हाण व चैतन्य चव्हाण यांनी आकर्षक शिवालयाची मांडणी केली आहे. याच परिसरातील अंजली व अश्विनी सोळसकर यांनी देखाव्याची परंपरा यंदाही कायम ठेवत पाटण तालुक्यातील दातेगडावरील प्रताप मारुतीची प्रतिकृती साकारली आहे. सोळंकी टॉवर्समधील दीपा प्रदीप कुलकर्णी यांनी साधेपणातून आकर्षक आरास केली आहे.

गौराईंच्या आगमनानिमित्त शहरातील विविध भागांत महिलांच्या हळदी-कुंकू कार्यक्रमांचीही शुक्रवारी सायंकाळी लगबग सुरू होती.

## घरासमोरून ७० हजारांची दुचाकी चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** घरासमोर हँडल लॉक करून पार्क केलेली होंडा कंपनीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना कवठे येमाई येथे घडली. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ सप्टेंबर रोजी रात्री दहा ते १५ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी यांच्या घरासमोर होंडा कंपनीची ग्रे रंगाची मोटारसायकल क्रमांक एमएच १२ झेडजे ०९८२ हँडल लॉक करून पार्क केली होती. सकाळी मोटारसायकल जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने सुमारे ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी १६ सप्टेंबर रोजी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार उबाळे तपास करीत असून, चोरीस गेलेली मोटारसायकल व आरोपीचा शोध सुरू आहे.

## मीना शाखा कालव्याच्या टेल भागाला पाण्याची प्रतीक्षा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** मीना शाखा कालव्याचे खरीप २०२६ चे आवर्तन सुरू होऊन पंधरवडा उलटला, तरी टाकळी हाजी, म्हसेसह टेल भागातील शेतकऱ्यांना अद्याप पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. पावसाने दडी मारल्याने बाजरी, सोयाबीन, डाळिंब, फळबागा तसेच जनावरांच्या चाऱ्याची पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत.

मीना शाखा कालव्याचे आवर्तन ३ सप्टेंबरपासून 'टेल टू हेड' पद्धतीने सुरू करण्यात आले आहे. मात्र, कालव्यात कमी दाबाने पाणी सोडले जात असल्याने आवर्तन अत्यंत संथगतीने पुढे सरकत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे टेल भागातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे. पावसाअभावी परिसरातील विहिरी व कूपनलिकांच्या पाणीपातळीत घट झाली आहे. कालव्याचे पाणी टेल भागापर्यंत पोहोचल्यास पिकांना दिलासा मिळण्यासोबतच विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. टाकळी हाजी शाखेंतर्गत आठ पाणी वापर संस्था असून, त्यांच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांकडून तातडीने पुरेशा दाबाने पाणी सोडण्याची मागणी होत आहे.



## आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढविण्याला विरोध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** पुणे जिल्ह्यात ग्रामीण भागात नवीन आपले सरकार सेवा केंद्रे सुरू करण्यासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, अनेक गावांत आधीच दोन ते तीन केंद्रे कार्यरत असून पुरेसे व्यवहार मिळत नसल्याने नवीन केंद्रांची गरज काय, असा सवाल विद्यमान केंद्रचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

दौंड तालुक्यातील अनेक गावांत ग्रामपंचायत ऑपरेटर, आपले सरकार सेवा केंद्र तसेच विविध ऑनलाइन सेवा केंद्रे कार्यरत आहेत. काही केंद्रांना दिवसाला दोनशे रुपयांचेही उत्पन्न मिळणे कठीण असल्याचे केंद्रचालकांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत त्याच गावात आणखी केंद्रे सुरू केल्यास जुन्या तसेच नव्या केंद्रचालकांच्या आर्थिक अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागासाठी मंजूर असलेली काही आपले सरकार सेवा केंद्रे प्रत्यक्षात दौंड शहरातील तहसील कार्यालय किंवा इतर ठिकाणी सुरू असल्याच्या तक्रारीही केंद्रचालकांनी केल्या आहेत. अशा तक्रारींची प्रथम तपासणी करून नियमबाह्य केंद्रांवर कारवाई करण्याऐवजी नवीन केंद्रे सुरू करण्याची प्रक्रिया का राबविली जात आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मंजूर केंद्र ग्रामीण भागासाठी असताना ते दौंड शहरात सुरू असल्यास नियमांची अंमलबजावणी नेमकी कशी केली जाते, याचे प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी होत आहे. नवीन केंद्र सुरू करण्यासाठी संगणक, प्रिंटर, इंटरनेट, वीज व जागा यासाठी खर्च करावा लागतो. मात्र, पुरेसे व्यवहार मिळत नसतील तर नवीन केंद्रचालकांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे नवीन केंद्रांची संख्या वाढविण्याऐवजी विद्यमान केंद्रांमध्ये अधिकाधिक महाऑनलाइन व शासकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केंद्रचालकांकडून होत आहे. या प्रकरणी अधिक माहिती घेण्यासाठी दौंड प्रांत अधिकारी इंगळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### जुन्या केंद्रांना सेवा उपलब्ध करून द्याव्यात

बेरोजगार युवकांना केवळ आपले सरकार सेवा केंद्राचा आयडी देणे म्हणजे रोजगारनिर्मिती नव्हे. नवीन केंद्रे सुरू करण्यापूर्वी विद्यमान केंद्रांची संख्या, व्यवहार आणि कार्यक्षमता यांचा आढावा घ्यावा. नियमबाह्य पद्धतीने सुरू असलेल्या केंद्रांची तपासणी करून कारवाई करावी. त्यानंतरच आवश्यकतेनुसार नवीन केंद्रांचा विचार करावा, अशी मागणी केंद्रचालकांकडून होत आहे.

**वारकरी को ऑप क्रेडिट सोसायटी लि. आळंदी र. नं.४८८१**
**१ ली वार्षिक आमसभेची नोटीस**
**फक्त सभासदाकरिता**

वारकरी को ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, आळंदी देवाची र. नं. ४८८१ या आपल्या संस्थेची १ ली वार्षिक आमसभा सोमवार दि.२८.०९.२०२६ रोजी दुपारी ठीक. १.०० वाजता आयोजित केली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती. वाजता संस्थेच्या कार्यालयात

**सभेतील कामकाजाचे विषय**
१) सभेच्या अध्यक्षाची निवड करणे
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे बाबत.
३) संस्थेचे सन २०२५-२०२६ (दि.३१/०३/२०२६ रोजी संपणाऱ्या) आर्थिक वर्षातील जमाखर्च नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंद्रात देणे बाबत.
४) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा विभागणीस मंजुरात देणेबाबत.
५) सन २०२६-२०२७ ह्या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजुरात देणे बाबत.
६) सन २०२५-२०२६ वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरात देणे बाबत.
७) सन २०२५-२०२६ या वर्षाचे अंकेक्षण अहवालाचे व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे बाबत.
८) सन २०२६-२०२७ करिता लेखा परिक्षकाची नेमणुक करणे बाबत.
९) संस्थेचे मा. संचालक व त्यांचे नातेवाईकांकडे असलेल्या कर्जाची माहिती देणे बाबत.
१०) पतसंस्थासाठी शासनाने दिलेली सुधारीत आदर्श उपविधी स्विकारण्याबाबत मंजुरात घेणे.
११) मा. अध्यक्षा साहेबांच्या परवानगीने वेळेवर उपस्थित होणारे विषय.

**संचालक मंडळाचे आदेशावरून**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | व्यवस्थापक |
| --- | --- | --- |
| **दिक्षा गजानन घुंडरे** | **स्वाती अशोक लांडे** | **विठ्ठल सुरवसे** |

**संचालक मंडळ**

| | | |
| --- | --- | --- |
| मंगेश लटके | संजय पाटणकर | प्रभाकर भुतेकर |
| पुरुषोत्तम भुतेकर | विनया भोसले | नंदकिशोर गोरे |
| राधा भोसले | रवी वाव्हाळ | महेश शेजूळ |

**टिप : १**) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयात आमसभेच्या तीन दिवस अगोदरलेखी पाठवावे. **२**) संस्थेचा चालु वर्षाचा ताळेबंद नफातोटा पत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. **३**) गणपुर्तीच्या अभावी सभा तहकुब झाल्यास स्थगित सभा त्याच दिवशी त्याचठिकाणी एका तासानंतर घेण्यात येईल.

## द • ख • ल

### अशोकराव मेसे यांना आदर्श शेतकरी पुरस्कार



**निघोज :** पारनेर तालुक्यातील गुणोरे गावचे प्रगतीशील शेतकरी अशोकराव मेसे यांना शुक्रवार दि.१८ सप्टेंबर रोजी बाजार समितीच्या वतीने आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. खा. नीलेश लंके तसेच बाजार समीतीचे सभापती गंगारामशेठ बेलकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येऊन सन्मानित करण्यात आले. मेसे हे गुणोरे येथे डाळिंब, द्राक्षे, कांदा,फळबागा आदी उत्पादन घेऊन प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांचा लौकिक आहे. खा. नीलेश लंके यावेळी म्हणाले प्रगतीशील शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन बाजार समीतीने शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले आहे. शेतकरी हा देशविकासाचा बिंदू असून सरकारने शेतीमालाला जास्तीत जास्त भाव देऊन शेतकरी हित पाहाण्याची गरज आहे. यावेळी अण्णा बढे, सुभाष खोसे, रामदास गाडीलकर, कचर कारखिले, किशोर गोपाळे, कुंडालिक बढे, दादाभाऊ ढवळे, एकनाथ मेसे, मच्छिंद गोपाळे, चंदर गोपाळे, जालू गोपाळे, ज्ञानदेव गोपाळे आदींनी मेसे यांचे अभिनंदन केले आहे.

### भावगीतांच्या सुरांनी रंगली पाथर्डीत गायन स्पर्धा



**पाथर्डी शहर :** गणेश फेस्टिव्हल २०२६ निमित्त शहरातील शेवाळे गल्ली येथील सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भक्तिगीत व भावगीत गायन स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध शाळांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुरेल गीतांनी उपस्थित रसिकांची दाद मिळविली. या स्पर्धेत श्री तिलोक जैन विद्यालयाची विद्यार्थिनी तन्वी मनोज मुनोत हिने प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. श्री स्वामी समर्थ विद्यामंदिराची अद्विता फुंदे हिने द्वितीय, तर विवेकानंद विद्यामंदिराची वेदिका आव्हाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. उत्कृष्ट गायनासाठी एम.एम. निहाळी विद्यालयाची पूनम सानप आणि स्वामी समर्थ विद्यामंदिराचा विवेक बडे यांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते इजाज शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी कलाशिक्षक प्रा. जनार्दन बोडके, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष वैभव शेवाळे, दिगंबर जोजारे, अभय गांधी, शाहरुख शेख, मोनीश उदबत्ते, उमेश रासने, मुकुंद सुराणा, शैलेश दहिफळे, दत्ता नरवणे, संजय शेट्टी, राहुल भगत आदी उपस्थित होते.

### खरवंडी कासारमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या तिव्र झळा

**खरवंडी कासार :** मोसमी पाऊस झाला नाही गावात सध्या दुष्काळ परिस्थिती आहे. पावसाळ्याचे तीन महिने लोटले तरीही समाधानकारक पाऊस झाला नाही. एप्रिल महिन्यापासूनच सुरू झालेले टँकर आजतागायत चालूच आहेत यामुळे बाजार पेठेत शुकशुकाट आहे. अल्पशा पावसा वर पेरणी झाली नंतर परत पाऊस न झाल्याने शेतातील पिके जळाली आहेत. शेतकऱ्यांनी केलेला हजारो रुपयांचा खर्च वाया गेला असून हाती काहीही आले नाही. पशुधनाला पाणी व चारा नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. गावात प्रचंड पाणीटंचाई आहे. टँकर सुरू होऊन चार महिने झाले आहेत. पूर्वी गावात थोड्याफार बोअरवेलला पाणी होते, ते आता पूर्ण बंद झाल्याने पाण्याची मागणी प्रचंड वाढली आहे. सर्व ग्रामस्थांना पुरेसे पाणी मिळत नाही. टँकरबाबत आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. गावात रस्ते लहान असल्याचे कारण देत टँकर गावाच्या काही भागात नेला जात नाही. मात्र याच रस्त्याने आजही बोअरवेलच्या गाड्या आणि मोठे ट्रक जातात. टँकर चालक रिस्क घेत नाहीत असा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

### ज्ञानज्योती पुरस्काराने प्राचार्य बाळासाहेब खिलारी सन्मानित



**टाकळी ढोकेश्वर :** स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी धोत्रे बु.श्रश्र यांच्या वतीने आदर्श शैक्षणिक नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी दिला जाणारा ज्ञानज्योती पुरस्कार टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नारायण खिलारी यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल देण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पा. यांच्या हस्ते हा पुरस्कार प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांना प्रदान करण्यात आला.यावेळी स्वास्थ्यदर्पण प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ.प्रशांत शिंदे,सचिव सोनाली शिंदे,प्राचार्य डॉ.जयदीप पवार, दुर्गादेवी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख,अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव अमोल ठाणगे,पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष भगवान राऊत, सहादू भोंडवे सर यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. बाळासाहेब खिलारी हे टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी असून त्यांनी एम.ए.बी.एड. (हिंदी) हे शिक्षण घेतले आहे. वाचन व गायन त्यांचा विशेष छंद आहे.अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अहिल्यानगर या संस्थेत ते कार्यरत आहेत. गेल्या २८ वर्षांपासून त्यांनी हिंदी विषयाचे अध्यापन करून राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचार व प्रसारासाठी योगदान दिले आहे.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. सध्या ते श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च विद्यालयाच्या प्राचार्यपदी ते कार्यरत आहेत. अध्यापनकार्य,शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीची धडपड आणि प्रभावी शैक्षणिक नेतृत्व यांची दखल घेत त्यांना ज्ञानज्योती पुरस्कार २०२६ देण्यात आल्याने त्यांचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे, डॉ. विवेक भापकर, ॲड विश्वासराव आठरे, मुकेश मुळे, ॲड.दिपलक्ष्मी म्हसे, नंदकुमार झावरे पा.,जी.डी.खानदेशे,गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी, अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे खजिनदार बाळासाहेब निवडुंगे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद यांच्या वतीने तसेच विद्यार्थी,पालक यांनी अभिनंदन केले आहे.

# आता पावसाऐवजी दुष्काळ कधी जाहीर होणार! याकडे जनतेचे लक्ष

रावसाहेब निकाळजे । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** पावसाळ्याचे चालू हंगामातील तीन महिने उलटुन गेले असून चौथा सप्टेंबर महिनाही अर्धा उलटून गेला असून सुद्धा अजूनही मेघराजाने बऱ्यापैकी पावसाची हजेरी न लावल्याने शेतकऱ्यांनी खरिपाची जी पेरणी केली आहे ती पूर्ण वाया गेली असल्याने आता मात्र पावसाची शक्यता संपली असून शासनाने मात्र आता कशाचीही वाट न पहाता तात्काळ दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्याबरोबरच नागरिकांना जी तातडीची मदत करता येईल ती ताबडतोब करावी अशी मागणी शेवगाव तालुक्यातील नागरिकांतून व शेतकऱ्यांतून होताना ऐकावयास मिळत आहे.

शेवगाव तालुका हा विस्ताराने मोठा तालुका म्हणून संबोधला जात असून ११३ गावांची संख्या असणाऱ्या या तालुक्यातील ७९ गावे खरीपासाठी तर उर्वरित ३४ गावे रब्बी साठी महसुलच्या दप्तरी नोंदले गेले आहेत. लगतच मराठवाडा हद्दीलगत असलेल्या पैठण येथील नाथसागर जलाशयाची निर्मिती होताना या तालुक्यातील असंख्य गावांना विस्थापित व्हावे लागलेले असून विस्थापित सर्वच्या सर्व गावांना इतरत्र स्थलांतरित व्हावे लागलेले आहे.

पैठण धरणाच्या निर्मितीसाठी शेवगाव तालुक्याचे मोठे योगदान असून आजपर्यंत या जलाशयात उपलब्ध झालेल्या पाण्याचा शेवगाव



तालुक्याला म्हणावा असा लाभ मिळालेला नसल्याने १०२ टी एम सी एवढी पाण्याची क्षमता असणाऱ्या या धरणाच्या ७६ टक्के पाण्याची जिवंत तर २६ टक्के पाण्याची मृत साठ्याची धरणाच्या दप्तरी नोंद असून निर्मितीपासून आजपर्यंत धरणातील पाणी प्रश्नावर शेवगाव तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांकडून लढे उभारले गेले असून त्या लढ्यातूनं मात्र तालुक्याला हक्काचे पाणी पाहिजे त्या प्रमाणात कधीच मिळाले नसून आजपर्यंत पाणी प्रश्नासाठी झालेल्या सर्व लढाया ह्या हवेतच विरल्या गेल्या असल्याचे अनेक जानकार नागरिक सांगताना आजही ऐकावयास मिळत आहे. धरणातून दोन कालवे गेलेले असताना त्यामध्ये डावा जो कालवा आहे तो अंदाजे २२५ की. मी. अंतराने नांदेड पर्यंत गेलेला असून. उजवा कालवा हा १३२ की.मी. च्या अंतराने माजलगाव येथे असणाऱ्या जलाशयात नेऊन झिरो करण्यात आला असून या कालव्यामुळे शेवगाव तालुक्यातील खडके, मडके, खामपिंपरी, खिर्डी, पिंगेवाडी, हातगाव, मुंगी व कांबी या गावांना काही अंशी लाभ झाला असून या व्यतिरिक्त अनेक गावातील शेतकऱ्यांनी गोदावरी खोरे मंडळाच्या पाटबंधारे विभागाकडून रीतसर परवानग्या घेऊन पाइपलाइनद्वारे पाणी नेलेले आहे.त्यातून काही गावांना लाभ मिळत आहे.शेवगाव तालुक्याची पावसाची सरासरी ६०० मी मी असताना चालू वर्षी तालुक्यात आजपर्यंत जो पाऊस झाला आहे. तो अत्यल्प झाला असून सुरुवातीला साधारण झालेल्या पावसावरच तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांनी मागचा पुढचा विचार न करता खरिपाच्या पेरणीचे शिजन वाया जाऊ नये म्हणून मोलमहागाईचे बी - बियाणे व खते आणि औषधे खरेदी करून त्याची पेरणी व लागवड केलेली असताना उगऊन आलेल्या पिकांना थोड्याफार पडलेल्या पावसाने दिलासा मिळाल्याने पिकातील अंतर्गत मशागतीचे कामही शेतकऱ्यांकडून झाले होते. मात्र गेली अनेक दिवसांपासून पुन्हा पावसाने मोठी विश्रांती घेतली असल्यामुळे शेतातील सर्वच्या सर्व उभी पिके करपल्याने वाया गेली असून अगोदरच आर्थिक अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या संकटाशी सामना करण्याची वेळ आली असून आता पावसाची अशाही मावळली असल्याने शासनाने आता वाट न पहाता ताबडतोब दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना व नागरिकांना जी मदत देण्यात येईल ती देण्यासाठी पावले उचलावीत अशी चर्चा संपूर्ण तालुक्यातून ऐकावयास मिळत आहे.

## राशीनमध्ये पावसासाठी मुस्लिम बांधवांची विशेष नमाज व दुवा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राशीन :** मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने राशीन व परिसरातील शेतकरी चिंतेत सापडला आहे. पिके करपू लागली असून शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, शेतकरी सुखी व्हावा आणि पाण्याचे संकट दूर व्हावे, यासाठी मुस्लिम समाजबांधवांकडून गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार अशा तीन दिवस दुपारी २ वाजता विशेष नमाज व दुवाचे आयोजन करण्यात आले.

गावाबाहेरील काझीनगर-परीटवाडी परिसरातील मदिना मकतब फाउंडेशनसमोरील मैदानावर राशीन व परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. यावेळी नमाज अदा करून अल्लाहच्या दरबारात हात उंचावून पावसासाठी आर्त दुवा करण्यात आली. नदी-नाले भरून वाहावेत, शेतशिवार हिरवेगार व्हावे, पिकांना जीवदान मिळावे तसेच मनुष्य, पशू-पक्ष्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दूर व्हावा, अशी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी मौलाना रहीम शेख व मौलाना उबेद काझी यांनी पावसासाठी विशेष दुवा केली. भावपूर्ण वातावरणात करण्यात आलेल्या या प्रार्थनेमुळे उपस्थित बांधव भावुक झाले. 'शेतकरी हा सर्वांचा अन्नदाता आहे. शेतकरी संकटात असेल तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. त्यामुळे जात-धर्माचे भेद बाजूला ठेवून शेतकरी व नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी ही दुवा करण्यात आली,' अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भर दुपारच्या उन्हात मुस्लिम बांधवांनी एकत्र येत पावसासाठी केलेल्या या विशेष नमाज व दुवेचे राशीन परिसरातून कौतुक होत आहे. लवकरच समाधानकारक पाऊस पडून शेतकरी आणि नागरिकांना दिलासा मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## ग्रामस्थांनी उपोषणाचा इशाऱ्यानंतर पिण्याच्या पाण्याचे टँकर नान्नजला सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथे गेल्या चार महिन्यांपासून पिण्याचे पाणी मिळत नाही धोंडपारगाव च्या तळ्यातील पाणी आटले असुन थोडफार पाणी होते ते पण नागरिकांना गटारी सारखे पंधरा ते वीस दिवसांला येत होते ते ही पाणी आता नान्नजच्या नागरिकांना मिळत नाही शासनाने नान्नज ला टँकर सुरू केले होते ते टँकर झिमझिम दोन तीन पाऊस झाल्याने बंद करण्यात आले होते

१६/९/२०२६ रोजी नान्नज व्यापारी असोसिएशन व ग्रामस्थ यांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदनद्वारे नान्नज ला त्वरित पिण्याचे पाण्याचे टँकर सुरू करा अन्यथा सोमवार दि.२१/९/२०२६ रोजी नान्नज बाजारतळ येथे आमरण उपोषण चा इशारा दिला होता उपोषणाचा इशारा देताच प्रशासनाने दोन दिवसात नान्नज ला तीन टँकर ची मंजुरी दिली असुन शनिवार दि. १९/९/२०२६ रोजी पासुन नान्नज ला पिण्याचे पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले. नान्नज ला २५/८/२०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसभा झाली त्या ग्रामसभेत सर्व ग्रामस्थांनी एकमुखी पाण्याचे टँकर सुरू करावे म्हणून मागणी केली होती परंतू एक महिना उलटला तरी अद्याप शासनाने कसलीच कार्यवाही केली नाही

या वेळी निवेदनावर सह्या कॉंग्रेस चे ता. अध्यक्ष शहाजी राजेभोसले, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष भरत मोहळकर, सचिव आप्पा मोहळकर, उपाध्यक्ष पांडु रजपूत, राष्ट्रवादी चे युवा नेते अमर चाऊस, अजय रजपूत, अंकुश मोहळकर, धनजंय गावडे, पोपट चव्हाण, जमील शेख, भागवत सोनवणे, भिवा साठे, आकाश साळवे, भुजंग दळवी, भिमराव पाद्रे, रमेश भुजबळ, विकास कांबळे, साहील सय्यद, बंडु गाजरे, गणेश पवार आदी ग्रामस्थ व व्यापारी असोसिएशन च्या साह्याने निवेदन देण्यात आले होते.

## समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयात 'आविष्कार' पोस्टर्स स्पर्धा उत्साहात




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे-बांगरवाडी येथे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, नवसंकल्पनांना आणि संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी 'आविष्कार' पोस्टर्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील अभियांत्रिकीच्या विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विज्ञान,तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव यांवर आधारित आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केले.

स्पर्धेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आदित्य कांबळे, ऋषिकेश रोडे, तनिष्का क्षीरसागर, साक्षी गाडीलकर, साहिल दाताळ, साक्षी गाडे, ज्योती दाताळ, ओमकार नरवडे, शिवम बोरुडे, अथर्व थोरात, किरण सागर, दीप्ती गुंजाळ, सिद्धेश भुजबळ, साक्षी पानसरे यांचा समावेश आहे. स्पर्धेचे परीक्षण डॉ. संदीप नेहे, प्रा. सुबोध घाडगे व प्रा. विजय काळे, प्रा. धनंजय भागवत, प्रा. प्रियंका लोखंडे, प्रा. प्रतीक्षा पानसरे, प्रा. पूजा घोडेकर,प्रा. अमोल दिघे तसेच डॉ.निवृत्ती चौधरी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या या सर्जनशील व बौद्धिक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, विवेक शेळके, वल्लभ शेळके, स्नेहलताई शेळके, प्रा. राजीव सावंत यांनी कौतुक केले.

## सौर लाईनसाठी ५० वर्षांची चिंचेची झाडे तोडणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदयात सौर प्लांट ते सबस्टेशन वीज जोडणीच्या कामात रस्त्याच्या हद्दीत पोल उभारण्याच्या तक्रारींसोबतच आता सुमारे ५० वर्षांपूर्वी लावण्यात आलेली चिंचेची जुनी झाडे तोडली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे सौर प्रकल्पाच्या कामामुळे पर्यावरणाचीही हानी होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

श्रीगोंदा - रेल्वे स्टेशन स्त्यालगत अनेक वर्षांपासून उभी असलेली ही चिंचेची झाडे परिसराची ओळख बनली आहेत. सौर लाईन टाकण्यासाठी झाडे तोडण्याची वेळ आली असेल तर संबंधित विभागाने पर्यायी मार्गाचा विचार केला आहे का, वृक्षतोडीसाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का आणि प्रत्यक्ष किती झाडे बाधित होणार आहेत.

याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे. दिवसा शेतीला वीज मिळावी यासाठी सौरऊर्जा प्रकल्प महत्त्वाचे आहेत; मात्र वीज जोडणी करताना रस्ते, शेतकरी, वाहतूक सुरक्षा आणि पर्यावरण या चारही बाबींचा समतोल राखणे गरजेचे आहे.

**विकासाच्या नावाखाली जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड; पर्यावरणाची हानी टाळण्याची मागणी**

पन्नास वर्षे वाढलेल्या झाडांवर काही तासांच्या कामासाठी कुऱ्हाड चालवण्यापूर्वी संबंधित यंत्रणांनी पर्यायी तांत्रिक मार्गांचा अभ्यास करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, रस्त्याच्या हद्दीत पोल उभारणे, परवानगीबाबत प्रश्न, शेतकऱ्यांच्या तक्रारी आणि आता जुन्या वृक्षतोडीचा मुद्दा यामुळे सौर लाईनच्या कामांची महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून संपूर्ण चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## श्रीक्षेत्र वृद्धेश्वर बेल आरती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अविनाश मंत्री



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** नाथ संप्रदायाची जन्मभूमी म्हणून देशभर परिचित असलेल्या श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथील पारंपरिक बेल आरती उत्सव समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. उत्सव समितीचे समन्वयक मुरलीधर पालवे यांनी कार्यकारिणीची घोषणा केली. समितीच्या अध्यक्षपदी पाथर्डीचे ज्येष्ठ सेवेकरी अविनाश मंत्री, तर उपाध्यक्षपदी तिसगावचे युवा सेवेकरी प्रसाद म्हस्के पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे दरवर्षी श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून भाद्रपद शुद्ध षष्ठीपर्यंत सव्वा महिना रात्री आठ वाजता बेल आरतीचा धार्मिक सोहळा पार पडतो. या काळात वृद्धेश्वर मंदिर परिसर भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माने भारून जातो. आरतीपूर्वी विशाल शिवपिंडीला मंत्रोच्चारांच्या गजरात बेलपत्रांनी आच्छादित करण्यात येते. त्यानंतर आकर्षक फुलांची सजावट केली जाते. या फुलांच्या सेवेसाठी पुणे, संभाजीनगर, अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यांसह विविध भागांतील भाविक मोठ्या श्रद्धेने फुले घेऊन वृद्धेश्वर येथे दाखल होतात. बेल आरतीच्या वेळी नाथ संप्रदायातील ८४ सिद्ध, नवनाथ आणि ५२ वीर वायुरूपाने उपस्थित असतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

नवीन कार्यकारिणीत सचिवपदी नानासाहेब चोथे, तर खजिनदारपदी तिसगावचे सुदर्शन सावंत व सतीश दारकुंडे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून शुभम चितळे, सुरज केदार, ज्ञानेश्वर पाठक, अशोक शिदोरे, करंजीचे संतोष अकोलकर आणि तिसगावचे श्रेयस डागा यांची नावे जाहीर करण्यात आली. यावेळी देवस्थान समितीचे प्रतिनिधी, कर्मचारी वर्ग, पुजारी व पुरोहित वर्ग तसेच बेल आरती उत्सव समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणपती विसर्जन बारव अस्वच्छतेच्या विळख्यात...

## पारनेर नगरपंचायतला विसर...! गणेशभक्तात नाराजी

संतोष सोबले । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर शहरातील वरच्या वेशीजवळ असलेल्या पारंपरिक गणपती विसर्जन बारवेची स्वच्छता करण्याकडे नगरपंचायत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने गणेशभक्तांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गणपती बाप्पाची स्थापना होऊन पाच दिवस उलटूनही बारवेची स्वच्छता करण्यात आलेली नसल्याने बारवेतील पाणी प्लास्टिक, रिकाम्या बाटल्या, कचरा तसेच अन्य घाण साचल्यामुळे मोठ्या प्रमाणात दूषित झाले आहे. त्यामुळे याच ठिकाणी गणपती विसर्जन करणाऱ्या घरगुती गणेशभक्तांसह विविध गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना अस्वच्छ पाण्यात विसर्जन करण्याची वेळ आली आहे.

पारनेर शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून विविध भागांतील गणेश मंडळे तसेच नागरिक गणपती विसर्जनासाठी या बारवेचा वापर करतात. मात्र, विसर्जनासाठी महत्त्वाच्या असलेल्या या बारवेची वेळेवर



स्वच्छता आणि साफसफाई न झाल्याने पाण्यात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. बारवेतील पाण्यावर प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या तसेच इतर कचरा तरंगताना दिसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर बारवेची स्वच्छता, पाण्यातील कचरा काढणे तसेच परिसराची साफसफाई करणे अपेक्षित होते. मात्र, नगरपंचायत प्रशासनाकडून याबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत असून धार्मिक स्थळाच्या परिसरात स्वच्छता राखण्याची मागणी होत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील सार्वजनिक ठिकाणे आणि विसर्जनस्थळे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने तातडीने बारवेतील कचरा आणि प्लास्टिक काढून पाण्याची स्वच्छता करावी, तसेच परिसराची साफसफाई करून गणेशभक्तांना योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिक व गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे.विसर्जनाच्या दिवसांपूर्वीच प्रशासनाने बारवेची स्वच्छता न केल्यास गणेशभक्तांना आणखी गैरसोयीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे नगरपंचायत प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार दि.२० सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# शिर्डीत सकल मातंग समाजाचा एल्गार

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणासाठी महामोर्चा




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : अनुसूचित जाती आरक्षणाचे 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' अशा उपवर्गीकरणाची मागणी आता राज्यभरात जोर धरू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर शिर्डी येथे सकल मातंग समाजाच्या वतीने एका भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे आमदार अमित गोरखे यांच्या आक्रमक नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या महामोर्चात राज्यभरातून हजारो मातंग बांधव, तरुण व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या शक्तिप्रदर्शनामुळे शिर्डी नगरीत काही काळ तणावपूर्ण व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. मोर्चादरम्यान आंदोलकांच्या हातात न्याय मागण्यांचे फलक झळकत होते. सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच आरक्षण उपवर्गीकरणाबाबत राज्यस्तरावर कार्यपद्धती राबवण्याबाबतचा अधिकार आणि निर्णय दिला आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये या उपवर्गीकरणाची अंमलबजावणी झाली असताना, महाराष्ट्रात मात्र अद्यापही हा प्रश्न प्रलंबित राहिल्याने समाजबांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याच मुद्यावर आक्रमक होत, महाराष्ट्रातही इतर राज्यांच्या धर्तीवर तातडीने आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे, अशी आग्रही व एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली. मोर्चाला संबोधित करताना नेत्यांनी स्पष्ट केले की, हा लढा कोणत्याही एका घटकाविरोधात नसून हा आमच्या हक्काचा आणि वंचितांच्या न्यायाचा लढा आहे. संविधानाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनुसार जे घटक अद्याप लाभांपासून वंचित राहिले आहेत, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हे उपवर्गीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे.

जोपर्यंत सरकार यावर ठोस निर्णय घेत नाही आणि आरक्षणाचे उपवर्गीकरण प्रत्यक्षात येत नाही, तोपर्यंत हा लढा असाच सुरू राहील आणि समाजबांधव रस्त्यावर उतरून संघर्ष करत राहतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. शिर्डीतील या यशस्वी शक्तिप्रदर्शनानंतर आता हा लढा अधिक तीव्र करण्याचे संकेत देण्यात आले आहेत. याच मुद्याला राज्यव्यापी रूप देण्यासाठी आगामी २९ तारखेला मुंबईतही अशाच प्रकारचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

या महामोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यात आले असून, आता शासन यावर काय भूमिका घेणार आणि उपवर्गीकरणाचा हा तिढा कसा सुटणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

# दिवसाढवळ्या मोटरसायकल चोरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शहरातील मल्हारवाडी रोडवरील अमिन ब्रदर्स किराणा दुकानासमोर उभी केलेली होंडा युनिकॉर्न मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली. सदर आरोपी मोटरसायकल चोरी करताना सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहे. मुकंदर रेहमान पठाण, वय ३५ वर्षे, रा. मल्हारवाडी रोड, राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीनुसार मुकंदर पठाण हे व्यापार करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल क्र. एमएच १७ एआर ३५५५ असून ते या वाहनाचा घरगुती कामासाठी वापर करतात दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास त्यांनी आपली युनिकॉर्न मोटारसायकल मल्हारवाडी रोडवरील अमिन ब्रदर्स किराणा दुकानासमोर हॅण्डल लॉक करून उभी केली होती. त्यानंतर ते व त्यांचा भाऊ अन्वर उस्मान पठाण यांच्या सोबत कामा निमित्त उंबरे येथे गेले होते. ते आपले काम आटोपून दोघेही दुपारी सुमारे १२ वाजता अमिन ब्रदर्स किराणा दुकानाजवळ आपली मोटारसायकल घेण्यासाठी परत आले. त्यावेळी पठाण यांना आपली मोटारसायकल तेथे दिसून आली नाही. त्यांनी आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला तसेच नागरिकांकडे चौकशी केली. मात्र मोटारसायकलचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात चोरट्याने मोटारसायकलचे हॅण्डल लॉक तोडून ती चोरून नेली. सदर मोटरसायकल चोरीची घटना सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळसीदास गिते हे करत आहे.

# डीजे बंदीविरोधात व्यावसायिकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : गणेशोत्सवात डीजे व ध्वनिवर्धक यंत्रणांवर घालण्यात आलेल्या सरसकट बंदीमुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरसकट बंदीऐवजी शासनाने ध्वनिमर्यादा व वेळेचे नियम निश्चित करून त्यानुसार व्यवसायास परवानगी द्यावी, या मागणीसाठी जिल्ह्यातील साऊंड, लाईट, जनरेटर असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १८ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषणाचा शनिवारी दुसरा दिवस असून प्रशासनाकडून अद्याप आंदोलनाची दखल घेण्यात आलेली नसल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. शासनाने निश्चित केलेल्या ध्वनिमर्यादा आणि वेळेच्या नियमांचे पालन करण्यास डीजे व्यावसायिक तयार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी; मात्र काहींच्या चुकीसाठी सर्व व्यावसायिकांना दोषी ठरवून सरसकट बंदी घालणे अन्यायकारक आहे, अशी भूमिका संघटनेने निवेदनातून मांडली आहे. डीजे व्यवसायावर चालक, ऑपरेटर, कामगार तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. व्यवसायावरील निर्बंधांमुळे अनेक व्यावसायिक आर्थिक अडचणीत आले असून, बँकांचे कर्ज आणि त्यावरील वाढता व्याजभार यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. त्यामुळे शासनाने व्यावसायिकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनात राहुरी तालुका साऊंड असोसिएशनचे अध्यक्ष दीपक साळवे, श्रीगोंदाचे मंगेश घोडके, पाथर्डीचे नय्युम शेख, शेवगावचे सचिन कराळे, नेवाशाचे प्रशांत मोटे, श्रीरामपूरचे युवराज भागवत, राहात्याचे नीतिकेश थेटे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

## मुरुम चोरी-तस्करी सुरुच; महसूल, पोलिस प्रशासन गप्प का ?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात दिवस-रात्र सुरू असलेल्या मुरूमाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा कधी बसणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विनाक्रमांकाचे डंपर तसेच दोन ट्रॉलीच्या ट्रॅक्टरमधून भरधाव वेगाने मुरूमाची वाहतूक होत असतानाही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सोनई पोलिस ठाण्याच्या परिसरातूनही अशी वाहने ये-जा करताना दिसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महसूल विभागाकडून या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा, तर उपप्रादेशिक परिवहन विभागाकडूनही वाहनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांचे मनोबल वाढत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. गेल्या काही दिवसांपासून परिसरात गौण खनिजाचे उत्खनन सुरू असून, केवळ किरकोळ कारवाई करून वाहने सोडली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुरूमाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वेगही मोठा असल्याने नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या मार्गावर यापूर्वी किरकोळ अपघात घडल्याचे नागरिकांनी सांगितले. भविष्यात गंभीर दुर्घटना घडू नये यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. अवैध उत्खनन व वाहतुकीमागे नेमके कोणाचे हितसंबंध आहेत, कारवाई का होत नाही, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन अवैध मुरूम उत्खनन व वाहतूक थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# विखे जेंव्हा वाड्यावर जातात...

## तनपुरेंच्या वाड्यावर सुजय विखेंची भेट

### जिल्हा बँकेच्या निवडणुकी पार्श्वभूमीवर हालचालींना वेग



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी येथे तनपुरे यांच्या वाड्यावर भेट देत आमदार प्राजक्त तनपुरे यांचा सन्मान केला. यावेळी ज्येष्ठ नेते अरुण तनपुरे यांच्यासह हर्ष तनपुरे तसेच कुटुंबीय व समर्थक उपस्थित होते. विधान परिषदेच्या निवडणुकीपूर्वी प्राजक्त तनपुरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून तनपुरे यांना भाजपकडून विधानपरिषदेची विधान परिषदेची संधी मिळाली.

या संपूर्ण राजकीय घडामोडीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार सुजय विखे पाटील यांची महत्वपुर्ण भूमिका ठरली आहे. आजची विखे यांची तनपुरे यांच्या वाड्यावरील भेट त्यामुळे विशेष चर्चेचा विषय ठरली असून सन्मानानंतर विखे यांनी तनपुरे कुटुंबीयांसोबत स्नेहभोजनाचाही लाभ घेतला. एकेकाळी राजकीय विरोधक म्हणून पाहिले जाणारे विखे आणि तनपुरे आता एकाच पक्षात असल्याने एकदिलाने काम करत आहे. सुजय विखे यांची तनपुरे यांच्या वाड्यावरची ही पहिलीच भेट आहे. दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक तोंडावर असताना ही भेट झाल्याने या भेटीत केवळ स्नेहभोजन झाले की आगामी जिल्हा बँकेच्या राजकारणावरही चर्चा झाली? असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

यापूर्वीही जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तनपुरे यांच्या वाड्यावर भाजपचे वरिष्ठ नेते भेट देत असल्याच्या घडामोडींना राजकीय अर्थ लावला गेला होता. गेल्या दोन महिन्यांपूर्वी ना.राम शिंदेंनी दिलेल्या भेटीनंतर आज विखे यांनी वाडा गाठल्याने वेगवेगळ्या चर्चेला उधान आले आहे.

# श्रीरामपूर तालुका पोलिसांची अवैध वाळू तस्करीवर धडाकेबाज कारवाई

## १४ लाख ९७ हजाराचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुका पोलीस स्टेशन हद्दीत गोदावरी नदीपात्रातून आणि शिवारामध्ये अनधिकृतपणे वाळूचा मोठ्या प्रमाणावर उपसा व साठा करून अवैध वाळूची चोरटी वाहतूक केली जात असल्याचे समोर आले असून भामाठाण शिवारामधील गोदावरी नदीपात्रात व जुन्या गावठाणात तब्बल १६५ ब्रास वाळूचा मोठा साठा बेवारस व अनोळखी व्यक्तींच्या नावावर लपवून ठेवलेला आढळला तर दुसऱ्या कारवाईत भामाठाण ते माळवाडगाव जाणाऱ्या मार्गावर रात्रीच्या वेळी अवैध वाळूची वाहतूक करणारा एक टेम्पो रंगेहाथ पकडण्यात आला असून एकूण १४,९७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक श्रीमती कल्पना अंबादास पवार यांनी श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारताच अवैध वाळू माफियांविरोधात अत्यंत आक्रमक आणि धडक भूमिका घेतली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस आणि महसूल विभागाने संयुक्तपणे अत्यंत नियोजनबद्ध रीतीने धाडी टाकल्या.

पहिल्या कारवाईत भामाठाण शिवारामधील गोदावरी नदीपात्रात व जुन्या गावठाणात तब्बल १६५ ब्रास वाळूचा मोठा साठा बेवारस व अनोळखी व्यक्तींच्या नावावर लपवून ठेवलेला आढळला, ज्याची किंमत ९,९०,००० रुपये आहे. तर दुसऱ्या कारवाईत भामाठाण ते माळवाडगाव जाणाऱ्या मार्गावर रात्रीच्या वेळी अवैध वाळूची वाहतूक करणारा एक टेम्पो रंगेहाथ पकडण्यात आला, ज्याची किंमत ५,०७,५०० रुपये आहे. या दोन्ही घटनांमध्ये मिळून एकूण १४,९७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम, खनिकर्म अधिनियम तसेच जमीन महसूल संहितेच्या विविध कडक कलमांखाली गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार, तहसीलदार मिलिंद वाघ, पोनि अरुण धनवडे, पोहेकॉ रामेश्वर ढोकणे, पोकॉ अमोल जाधव, होमगार्ड अमोल आमले, सलमान सय्यद, ग्राम महसूल अधिकारी अशोक चितळकर, प्रशांत आहोळ, राहुल साठे व सुरेंदर पवार यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## बेकायदेशीर गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

### २१ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील तपोवन रोडवर असलेल्या बेकायदेशीर गॅस रिफिलीग सेंटरवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने छापा टाकला. या कारवाईत सुमारे १३३ घरगुती व कमर्शियल टाक्यांसह २१लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने ही धडक कारवाई केली. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, शहरातील तपोवन रोडवर असलेल्या किरण गलांडे (रा. दक्षता नगर, तपोवन रोड) याने त्याच्या मालकीच्या गाळ्याच्या पाठीमागील मोकळ्या जागेत घरगुती वापराच्या गॅस टाक्यामधून कमर्शियल गॅस टाक्यांमध्ये रिफिलिंग करण्यासाठी ठेवले असून तो विनापरवाना गॅसची विक्री करत आहे. अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, प्रताप देवकाते, मनोज साखरे, अमोल कोतकर यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन छापा टाकला. तेथे दोघेजण घरगुती गॅस टाक्यात इलेक्ट्रिक मोटर जोडून वजन काट्यावर ठेवताना दिसून आले. त्यांनी परवाना नसल्याचे सांगितले. या पथकाने कला रघुराज सिंग (रा. गजानन कॉलनी), गौरव राजेंद्र आढाव (रा. आढाववाडी, पिंपळगाव माळवी) या दोघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या तरुणांकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा व्यवसाय हा किरण संतोष गलांडे (रा. दक्षता नगर तपोवन रोड ) याच्या मालकीचा असून रिफिलिंग करण्यासाठी लागणाऱ्या घरगुती गॅस टाक्या नितीन कदम (पूर्ण नाव माहित नाही) याच्याकडून खरेदी केल्या असल्याची माहिती सांगितली. पोलीस पथकाने भारत गॅस कंपनीच्या ५६ घरगुती, ४६ कमर्शियल गॅस टाक्या भरलेल्या व २ घरगुती गॅस टाक्या रिकाम्या, एचपी गॅस कंपनीच्या २३ घरगुती गॅस टाक्या, ३ कमर्शियल गॅस टाक्या भरलेल्या व ३ कमर्शियल गॅस टाके रिकाम्या, २ इलेक्ट्रिक मशीन, २ इलेक्ट्रिक वजन काटे असा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास तोफखाना पोलीस करीत आहे.

# धरण उशाला, तरी कोरड घशाला!

## मुळा नदीकाठच्या शेतकऱ्यांचा पाण्यासाठी आक्रोश; डीवाय-३ चारीला पाणी सोडण्याची मागणी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : मुळा धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही नेवासा तालुक्यातील मुळा नदीकाठच्या पानेगाव, खेडलेपरमानंद, निभांरी, शिरेगाव आदी परिसरातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी टंचाईचा सामना करावा लागत आहे. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी परिस्थिती निर्माण झाली असून, मुळा धरणाच्या आवर्तनाचे योग्य नियोजन होत नसल्याने पिके पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे. मुळा धरणात पाणी असतानाही नदीकाठच्या शेतकऱ्यांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

विशेषतः डीवाय-३ चारीला पाणी सोडण्याची मागणी वारंवार करूनही अद्याप पाणी सोडण्यात आलेले नाही, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेवासा तालुका पदाधिकारी विठ्ठल जाधव यांनी दिली. डीवाय-३ चारीला तातडीने पाणी सोडण्याबरोबरच मुळा नदीवरील बंधारे भरून देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. बंधाऱ्यांमध्ये पाणी साठल्यास परिसरातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी वाढून पिकांना मोठा आधार मिळू शकतो, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

पावसाची अनिश्चितता आणि सिंचनाच्या पाण्याचे अपुरे नियोजन यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. वेळेत पाणी न मिळाल्यास उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. आवर्तनाचे नियोजन करताना लाभक्षेत्रातील शेवटच्या टप्प्यातील शेतकऱ्यांचाही विचार करावा आणि कालव्यात पाणी सोडल्यानंतर ते प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचते की नाही, याची पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांना संघटित करून आंदोलन उभारण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

### लोकप्रतिनिधींनी मौन सोडावे : विठ्ठल जाधव

मुळा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नावर लोकप्रतिनिधींनी ठोस भूमिका घ्यावी. डीवाय-३ चारीला तातडीने पाणी सोडून नदीकाठावरील बंधारे भरून द्यावेत, अशी मागणी विठ्ठल जाधव यांनी केली. यावेळी शिवाजी जाधव, उपसरपंच भगीरथ जाधव, कुशीरामजी जाधव, धनराज तुवर यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# करणी बाधेची भीती व बायबलचा धाक धर्मांतराचा प्रयत्न

## राहात्यात फादरला ठोकल्या बेड्या




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : आजारपण आणि कौटुंबिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन एका पीडित महिलेस आणि तिच्या भावाला बळजबरीने ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात एका तथाकथित फादर विरुद्ध जादूटोणा विरोधी कायदा आणि महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राहाता तालुक्यातील अस्तगाव माहेर असणाऱ्या २१ वर्षाच्या तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की आरोपी नारायण भाऊसाहेब चव्हाण, रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर याने २९ ऑगस्ट २०२६ च्या रात्रीपासून ते १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत हा प्रकार केला. फिर्यादी हिंदू धर्माची असून तिचे संपूर्ण कुटुंब हिंदू असल्याचे माहीत असतानाही आरोपीने तिच्या अडीअडचणीचा आणि वाईट परिस्थितीचा फायदा घेतला.

या पीडित महिलेचे काही महिन्यांपूर्वी बाळंतपण झाले होते आणि त्यानंतर तिची तब्येत सतत बिघडत होती, त्यामुळे नातेवाईकांनी तिला एका व्यक्तीकडे नेले होते. त्या संधीचा फायदा घेत आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधून फोनवरच मंत्रोच्चार सुरु केला आणि त्यानंतर १६ सप्टेंबर रोजी सकाळी तो थेट फिर्यादीच्या माहेरी अस्तगाव येथे आला. तिथे त्याने तुला करणी बाधा झाली आहे ती दूर करावी लागेल असे सांगत बायबलचे पुस्तक काढून मंत्रोच्चार केले आणि तुझी करणी दूर करण्यासाठी तुला ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागेल असे प्रलोभन दाखवून बळजोरीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. एवढेच नव्हे तर फिर्यादीचा भाऊ प्रशांत यास देखील बळजबरीने ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी प्रवृत्त केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान पीडितेच्या तक्रारीवरून राहाता पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी आणि अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३(१), ३(२) आणि महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ चे कलम ९(१), ९(२) अन्वये एफआयआर क्र. ०३८३/२०२६ नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक दिपक सरोदे यांचे मार्ग दर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कोमल कुमावत या करत आहेत.

### हिंदू असून फादरच्या वेशात

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे आरोपी नारायण चव्हाण याची जात स्वतः हिंदू मराठा असल्याचे निष्पन्न झाले आहे . हिंदू असूनही तो स्वतःला फादर म्हणून सांगत ख्रिश्चन धर्माचा प्रचार करून फसवणूक करत होता, असे पोलीस तपासात समोर आले आहे. स्थानिक नागरिकांच्या भोळेभाबडेपणा व मजबूरी चा गैरफायदा घेऊन बळजबरीने किंवा प्रलोभन दाखवून तो धर्मांतर करत असल्याचे उघड झाले आहे.